







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०७.०३.२०२६ | अंक नं. २८० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# अहिल्यानगर मनपात 'शिवसेना शिंदे गटाचा' विरोधी पक्षनेता नियुक्त करावा : आयुक्तांचे पत्र

नगर - अहिल्यानगर महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) महापौर व भाजपाचे उपमहापौर आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गट हा सर्वाधिक संख्याबळ असलेला विरोधी पक्ष असून, या पक्षाचे गटनेते दत्तात्रय कावरे यांनी १० फेब्रुवारी रोजी दिलेल्या पत्रानुसार त्यांच्या पक्षाचे बाळासाहेब बोराटे यांची विरोधी पक्षनेतापदी नियुक्ती करण्यात यावी, असे पत्र महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी महापौर ज्योती गाडे यांना दिले आहे.

या पत्रात आयुक्त डांगे यांनी म्हटले आहे की, शिवसेना शिंदे गटाचे गटनेते दत्तात्रय कावरे यांनी १० फेब्रुवारी रोजी पत्र दिलेले आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत शिवसेना पक्षाचे १० नगरसेवक निवडून आले व शिवसेना पक्षाच्या गटनेतेपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे आणि नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांची महानगरपालिकेत विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी शिफारस करत आहे, याप्रमाणे त्यांनी या पत्रात कळविले आहे.

तथापि, महानगरपलिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) (अअ) नुसार विरोधी पक्ष नेता नियुक्तीबाबत जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या विरोधी पक्षाचा, त्यावेळी नेता असेल, आणि महापौराकडून ज्याला मान्यता मिळाली असेल, तो विरोधी पक्ष नेता असेल. याप्रमाणे अधिनियमात तरतुद केलेली आहे. तरी, नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी (अजित पवार गट) या पक्षाचे महापौर आणि भारतीय जनता पार्टीचे उपमहापौर हे पदाधिकारी सत्तेत आहेत. उपरोक्त तरतुदीनुसार शिवसेना हा पक्ष मोठा संख्याबळ असलेला विरोधी पक्षाच्या भुमिकेमध्ये कार्यरत असेल. त्यामुळे शिवसेना या पक्षाच्या विरोधी पक्ष नेता म्हणून संदर्भीय पत्रानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे आयुक्त डांगे यांनी या पत्रात म्हंटले आहे.














खास लग्नसमारंभासाठी
* डिश, वाटी, पत्रावळी, पेपर ग्लास
* ॲल्यु. कंटेनर, बॉक्सेस
* फॅन्सी टोपली, भेट पाकीटे
* रॅपींग पेपर, बटर पेपर, सिल्व्हर फॉईल
* रुखवत बॉक्सेस
* डेकोरेशन ॲटम
* सर्व प्रकारच्या सरकारमान्य पिशव्या इतरही बरेच काही
पिशव्या प्रिंटींगसाठी
मधूर प्लास्टीक
घासगल्ली, अ.नगर.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

दीप गार्ड पावर सिस्टम
सर्व कंपनीचे इन्व्हर्टर व बॅटरी रिपेअर करुन मिळेल.
बॅटरी वॉटर टाकून मिळेल.
घरपोहोच सेवा
जुने इन्व्हर्टर बॅटरी विकत घेतो व विकतो
9260000613



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक





# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# 'युद्धा'च्या पार्श्वभूमीवर गॅस टंचाईची भीती; नागरिकांनी केली सिलेंडर घेण्यासाठी रांगा

नगर – इराण–अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतात केवळ २० दिवस पुरेल इतकाच गॅस शिल्लक असून, भविष्यात गॅस टंचाई निर्माण होऊ शकते, अशी भीती लोकांमध्ये पसरली आहे. त्यामुळे नगर शहरात काही ठिकाणी नागरिकांनी घरगुती सिलेंडर घेण्यासाठी रांगा लावल्याचे दिसून आले. दरम्यान भारत पेट्रोलियम कंपनीचे जिल्ह्याचे समन्वयक राजेशकुमार मिश्रा यांनी सर्वत्र गॅस पुरवठा सुरळीत असून, टंचाईची काहीही शक्यता नसल्याचे दै. नवा मराठाशी बोलताना सांगितले.

इराण–अमेरिका युद्धामुळे इंधन टंचाईचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता वर्तविली जात आहे. भारतात केवळ २० दिवस पुरेल इतकाच इंधन साठा असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे हे युद्ध लांबले तर गॅसचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, अशी भीती लोकांमध्ये दिसून येत आहे. दरम्यान गॅस एजन्सीला जेंव्हढे बुकींग झाले आहे, तेव्हढेच घरगुती गॅस सिलेंडर मिळत आहे. तसेच तांत्रिक कारणामुळे ऑनलाईन बुकींग बंद असल्याचे सांगण्यात येते. व्यावसायिक गॅस सिलेंडरही मागणीच्या तुलनेत ७० टक्केच पुरवठा होत असल्यामुळे व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे.





युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस टंचाईच्या भीतीमुळे शहरातील नागरिकांची गुलमोहर रोडवरील ममता गॅस एजन्सीमध्ये लागलेली रांग. (छाया धनेश कटारिया)

भारत पेट्रोलियम कंपनीचा ऑनलाईन गॅस बुकींगच्या क्रमांकावरुन तांत्रिक अडचणीमुळे गॅस बुकींग होत नाही. त्यामुळे देखील नागरिकांमध्ये गॅस टंचाई झाल्याची भीती बळावली आणि अनेक नागरिकांनी घरगुती गॅस सिलेंडर घेण्यासाठी रांगा लावल्याचे चित्र पहायला मिळाले. काही एजन्सीला मागणीच्या तुलनेत कमी पुरवठा केला जात आहे. त्यामुळेही गॅस सिलेंडर मिळत नसल्याचे सांगण्यात आले. व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठादेखील कमी करण्यात आला आहे. मात्र, विक्री पूर्णपणे बंद करण्यात आलेली नाही. कंपनीकडून अद्याप अधिकृतपणे सध्या निर्माण झालेल्या अडचणींबाबत सांगितले जात नाही. मात्र, एका अधिकाऱ्याने नाव न घेण्याच्या अटीवर गॅस पुरवठा कमी करण्यात आला आहे, पुढील आणखी काही दिवस अशी परिस्थिती राहू शकते, असे दैनिक नवा मराठाशी बोलताना सांगितले.

दरम्यान कमर्शियल गॅस सिलेंडरची विक्री सरकारने बंद केल्याची माहितीही सोशल मीडियावरुन पसरली. ती पूर्णपणे अफवा असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

## जग गोंगाटात असलं तरी पोर्टफोलिओ गोंधळात नसावा

दर काही महिन्यांनी जगात कुठेतरी काहीतरी घडतंच. भूराजकीय तणाव, निवडणुका, व्याजदर निर्णय, जागतिक बाजारातील हालचाली आणि अचानक गोंधळ वाढतो. फोन वाढतात. संदेश वाढतात.



राजन कुटे

काही बदल करायचा का?
हे गंभीर आहे का?
बाजार पडणार का?
शांतपणे एक गोष्ट सांगतो – जागतिक अनिश्चितता नवीन नाही.

बाजारांनी युद्धं पाहिली आहेत, धोरण बदल पाहिले आहेत, चलनातील चढउतार पाहिले आहेत, मंदी आणि पुनरुज्जीवन पाहिलं आहे. तरीही दीर्घकालीन संपत्ती परिपूर्ण परिस्थितीत तयार झालेली नाही. ती अनिश्चिततेतच तयार झाली आहे.

जर तुमचा पोर्टफोलिओ तुमची उद्दिष्टे, कालावधी आणि जोखीम क्षमता पाहून तयार केलेला असेल, तर तो एका बातमीसाठी बनवलेला नसतो. तो चक्रांसाठी बनवलेला असतो. हा फरक महत्त्वाचा आहे.

तुमच्या एसआयपी रोजच्या बातम्यांवर चालत नाहीत. तुमचं मालमत्ता वाटप साप्ताहिक चर्चांवर आधारलेलं नसतं. तुमची दीर्घकालीन योजना एका घटनेवर उभी नसते.

हो, अल्पकालीन हालचाली होतील. त्या नेहमीच होतात. पण जग प्रतिक्रिया देतं म्हणून तुमच्या पोर्टफोलिओने भावनिक प्रतिक्रिया द्यायची गरज नाही. Bombay Stock Exchange आणि National Stock Exchange यांच्या इतिहासात जागतिक तणावाचे अनेक टप्पे आले आणि गेले. पण सातत्यपूर्ण सहभाग कायम राहिला. हा वास्तव नाकारण्याचा प्रयत्न नाही. हा प्रमाणात प्रतिक्रिया देण्याचा दृष्टिकोन आहे. तुमच्या वैयक्तिक परिस्थितीत बदल झाला तर आपण पुनरावलोकन करतो. बाजार अपेक्षित चढउतारात असेल तर आपण स्थिर राहतो. गोंधळ वाढला पण पाया ठाम असेल तर आपण शांत राहतो.

स्थैर्य बाजारात नसतं. स्थैर्य दृष्टिकोनात असतं. अनिश्चित काळात पटकन निर्णय घ्यावासा वाटतो. पण दीर्घकालीन परिणाम सातत्यातून तयार होतात, घाईतून नाही.

जग अनिश्चित राहील. तुमची गुंतवणूक प्रक्रिया तशी असण्याची गरज नाही.

स्पष्ट ठेवा. शांत ठेवा.

**राजन कुटे, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक**
**मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०**

## मोपेडवर चाललेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्याने हिसकावून पळविले

नगर – मोपेडवर रस्त्याने चाललेल्या महिलेच्या गळ्यातील २ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र पाठीमागून दुचाकीवर आलेल्या चोरट्याने हिसका मारून तोडून पळवून नेल्याची घटना शहरातील स्टेशन रोडवर लोखंडी पुलाजवळ ५ मार्च रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत उल्का मनोज बनकर (रा. सागर कॉम्प्लेक्स, आगरकर मळा) यांनी ६ मार्च रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ५ मार्च रोजी सायंकाळी कार्यक्रमानिमित्त त्यांच्या भाची सोबत मोपेडवर शहरात आल्या होत्या. रात्री १० वाजण्याच्या सुमारास कार्यक्रमातून घरी परतत असताना, लोखंडी पुलाजवळ त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका अनोळखी दुचाकीस्वाराने त्यांना गाठले. क्षणाचाही विलंब न करता, आरोपीने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे २ तोळे वजनाचे मंगळसूत्र हिसकावले आणि मल्हार चौक दिशेने पोबारा केला.

या प्रकरणी बनकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०४ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा कसून शोध सुरू केला आहे. शहराच्या वर्दळीच्या रस्त्यावर घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या चोरीचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करत आहेत.

## घर फोडून रोकड व दागिन्यांची चोरी

नगर – यात्रेनिमित्त घराला कुलूप लावून गावी गेलेल्या कुटुंबाचे घर चोरट्यांनी फोडून घरातील कपाटातून रोख रकमेसह दागिने, जुनी नाणी असा ऐवज चोरून नेल्याची घटना बोल्हेगाव परिसरातील कळमकर नगरमध्ये भारत बेकरीजवळ घडली आहे. ही घटना २ ते ४ मार्च या कालावधीत घडली आहे.

याबाबत देवेंद्र रामराव हापसे (वय ४४, रा. भारत बेकरी जवळ, कळमकर नगर, बोल्हेगाव) यांनी ६ मार्च रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २ मार्च रोजी घराला कुलूप लावून कुटुंबासह देहरे या गावी यात्रेनिमित्त गेले होते. घर बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी अत्यंत शिताफीने घराच्या मागील आणि समोरील बाजूचे दरवाजे कशाच्या तरी सहाय्याने उचकटले. घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी कपाटातील सामानाची उचकापाचक केली. यात २० हजार रुपये रोख रक्कम, २५ हजार रुपये किमतीची एक तोळ्याची सोन्याची माळ आणि जुन्या काळातील ऐतिहासिक नाणी असा एकूण ४५ हजार ३० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.

गावाहून घरी परतल्यावर चोरी झाल्याचे लक्षात येताच देवेंद्र हापसे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेतली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएसकलम ३०५ (अ), ३३१ (३), (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आला आहे.

पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक माहितीच्या आधारे चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## ऑनलाइन 'हॉटेल रेटिंग' मधून नफ्याच्या नावाखाली व्यावसायिकाची २५.९४ लाखांची फसवणूक

नगर – हॉटेलला ऑनलाइन रेटिंग देण्यातून मोठ्या प्रमाणात नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून नगर शहरातील व्यावसायिकाची दोघा सायबर गुन्हेगारांनी २५ लाख ९४ हजार ३९० रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सावेडी उपनगरातील प्रोफेसर कॉलनी चौकातील रहिवासी व व्यावसायिक असलेल्या ३९ वर्षीय व्यक्तीने ६ मार्च रोजी सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सदरची फसवणुकीची घटना ही ६ नोव्हेंबर २०२५ ते ११ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घडली. संशयित आरोपी दीपक नायर उर्फ नविनराज आणि मेघा उर्फ मालू या दोघांनी व्हॉट्सपच्या माध्यमातून फिर्यादीशी संपर्क साधला. हॉटेलला ऑनलाइन रेटिंग दिल्यास तुम्हाला २० ते ३० टक्के नफा मिळवून देतो, अशी थाप मारून त्यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

या आमिषाला बळी पडून फिर्यादीने आरोपींना ऑनलाईन पैसे पाठविले. मात्र, परतावा न मिळाल्याने आणि गुंतवणूक केलेली रक्कमही परत न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर फिर्यादीने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी दीपक नायर आणि मेघा यांच्यावर बीएनएस कलम ३१८ (४), ३१९ (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोनि. सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, सायबर गुन्हेगारांचा शोध घेतला जात आहे.

## अनिता मुनोत यांचे संथारा व्रतात निधन

नगर – उत्कर्ष बंगला भवानीनगर येथील रहिवासी अनिता राजकुमार मुनोत (वय ६२) यांचे ७ मार्च रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे, भावजया असा परिवार आहे. राजकुमार फुलचंद मुनोत यांच्या त्या पत्नी तर अक्षय व विनीता हर्षल भंडारी यांच्या मातोश्री होत.

## नगरमध्ये जमीन विक्रीच्या व्यवहारात व्यापाऱ्याची कोट्यवधी रुपयांची फसवणूक

### न्यायालयाच्या आदेशानंतर १८ जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – शहरातील दरेवाडी परिसरातील जमीन विक्रीच्या व्यवहारात १८ जणांनी संगनमत करून व्यापाऱ्याची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी फिर्यादी सुशील श्रीकांत रानमळकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रानमळकर यांनी दरेवाडी (ता.नगर) येथील गट क्रमांक १६८/२ अ ही जमीन खरेदी केली होती. या जमिनीच्या जुन्या न्यायालयीन वादाचा गैरफायदा घेत आरोपी दत्तू बबन राहिंज, पांडुरंग बबन राहिंज, सुग्रीव विष्णू राहिंज, दुर्वास विष्णू राहिंज, सुनिता कैलास शिंदे, मनिषा गौतम राहिंज, दिव्या गौतम राहिंज, भारती गौतम राहिंज, ओम गौतम राहिंज, आकाश पांडुरंग राहिंज, पवन पांडुरंग राहिंज, राहुल पांडुरंग राहिंज, सचिन दत्तात्रय राहिंज, अजय सुरेश औसरकर, विजय दत्तात्रय करांडे, अमोल कांतीलाल मुथा, आणि गणेश रोहिदास शेलार यांनी कट रचला.

या आरोपींनी फिर्यादीची दिशाभूल करत सदर जमीन परस्पर १ कोटी ३ लाख रुपयांना बेकायदेशीरपणे विक्री केली. या व्यवहारात आरोपींनी संगनमत करून फसवणूक केली आहे. जेव्हा फिर्यादीने या फसवणुकीबाबत आरोपींकडे विचारणा केली, तेव्हा त्यांना शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी देऊन हुसकावून लावले.

त्यामुळे फिर्यादी यांनी न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले. त्या आदेशानुसार कोतवाली पोलिसांनी ६ मार्च रोजी १८ आरोपींविरुद्ध फसवणूक, बनावटगिरी, धमकी देणे आणि संगनमत करणे यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला स.पो.नि. थोरात या करत आहेत.



## हनुमान चालिसा पाठ

**रविवार दि. ८/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**त्रिमुर्ती मित्र मंडळ,** सिंधी सभा हॉल, तारकपूर

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर,** गणेशनगर, कल्याण रोड, स्वप्निल अंकम ९५११४६६६६६

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**अभिषेक चिपाडे,** चिपाडे मळा, सारसनगर, ८८८८६८६६८६, ९७६६४११९११

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**साईनगर परिवार,** साईनगर, नक्षत्र लॉन जवळ, बुरुडगाव रोड

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री रामदेवरा दरबार,** सारसनगर, ९८२२००९७८२

## रमेश धाडगे यांचे हृदयविकाराने निधन

भिंगार – सौरभनगर येथील रहिवासी रमेश नामदेव धाडगे (वय ६५) यांचे ६ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ७ मार्च रोजी शुक्लेश्वर मंदिराजवळील भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ भाऊ, भावजया, १ मुलगी, सुन, जावई, पुतणे, पुतणी, नातवंडे असा परिवार आहे.

## जामखेड येथील कावेरी हॉटेलवरील गोळीबारप्रकरणी एकास अटक

नगर – जामखेड येथील न्यू कावेरी हॉटेलमध्ये झालेल्या गोळीबार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय उर्फ चिंग्या विश्वनाथ मोरे (वय २४, रा. पाटोदा गरड, ता. जामखेड) याला स्थानिक गुन्हे शाखा व जामखेड पोलिसांच्या पथकाने खर्डा परिसरातून अटक केली.

रोहित अनिल पवार (वय २९, रा. कान्होपात्रानगर, जामखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १८ डिसेंबर २०२५ रोजी बीड रोडवरील न्यू कावेरी हॉटेलमध्ये शुभम शहाराम लोखंडे, उल्हास विलास माने उर्फ वस्ताद, अक्षय उर्फ चिंग्या मोरे, अर्शद अमीन सय्यद व अन्य ६ ते ७ जणांनी एकत्र येऊन पिस्तुलातून गोळीबार करत पवार यांना गंभीर जखमी केले. तसेच हॉटेलमधील साहित्य व फॉर्च्युनर वाहनाची सत्तुर व लाकडी दांड्याने तोडफोड केली होती. या घटनेतील दोन आरोपींना यापूर्वीच पोलिसांनी अटक केली होती. तर मोरे फरार होता. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांना तो खर्डा परिसरात आल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर यापूर्वीही जामखेड पोलीस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न व आर्म्स अॅक्टसह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपीला पुढील तपासासाठी जामखेड पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून तपास सुरू आहे.

## संजय भांबळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बुरुडगाव रोड भांबळ गल्ली येथील रहिवासी संजय छबुराव भांबळ (वय ५८) यांचे ६ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, आई असा परिवार आहे.

## कलाबाई लिंबोरे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – श्रीमती कलाबाई लक्ष्मण लिंबोरे (वय ९२) यांचे ७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सारोळा कासार स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. सैनिक परिवार ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्था सारोळा कासारचे मा. चेअरमन शिवाजीराव लक्ष्मण लिंबोरे यांच्या त्या मातोश्री होत.

## किसनराव कुताळ यांचे अल्प आजाराने निधन

वाळकी – अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव येथील शेतकरी किसनराव रामभाऊ कुताळ (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, बहिणी, दोन भाऊ, पुतणे असा परिवार आहे. डॉ. काकासाहेब कुताळ, मेजर कल्याण कुताळ व उध्दव कुताळ यांचे ते वडील तर डॉ. प्रशांत कुताळ यांचे चुलते होत.



## महिला बेपत्ता

नगर – नगर तालुक्यातील मठपिंप्री येथील माया संतोष तांदळे ही महिला ३ मार्च रोजी होळीच्या दिवसांपासून घरातून बेपत्ता झाली आहे.



माया तांदळे

त्या घरातून बाहेर गेल्यानंतर परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला, मात्र अद्याप त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

कुटुंबीयांनी नातेवाईक, ओळखीचे तसेच परिसरातील विविध ठिकाणी शोध घेतला आहे. तसेच आश्रम, सार्वजनिक ठिकाणे आणि इतर ठिकाणीही चौकशी करण्यात येत आहे. तरीही त्या कुठेही आढळून आलेल्या नाहीत.

माया तांदळे या कुठेही आढळल्यास किंवा त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी संपर्क क्रमांक – मो. ९८८१५०७३७५ मो. ८६६८५८४५४० यावर किंवा नगर तालुका पोलिस ठाण्यात तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सहकार पणन व वस्रोद्योग विभाग

**मे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या. अ. नगर महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.**

### जाहीर समन्स

भैरवनाथ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, केडगाव, अहिल्यानगर. ता.जि. अहिल्यानगर या संस्थेने त्यांचे कर्जदार/जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक. ०८/०४/२०२५ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक २७/०५/२०२५ व दिनांक १८/११/२०२५ व दिनांक १५/०१/२०२६ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक १०/०६/२०२५ व दिनांक २४/०६/२०२५ व दिनांक २८/०१/२०२६ व दिनांक १३/०८/२०२५ व दिनांक १८/११/२०२५ व दिनांक १०/१२/२०२५ व दिनांक २३/१२/२०२५ व दिनांक २८/०१/२०२६ व दिनांक १०/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती.सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक ११/०३/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा नं.४, पहिला मजला, जीएस महानगर बँकेशेजारी, अहिल्यानगर यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदाराचे नांव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १२७ ----- २०२५ | जाबदेणार १) श्री. गणेश केरप्पा हुचे. पत्ता: हॉटेल रुपाली, ब्राम्हण गल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर. जाबदेणार २) श्री भास्कर हंसराज गायकवाड. पत्ता :– ब्लॉक नं.२४, रूम न.३३३, पोलीस हेडक्वॉर्टर, सर्जेपुरा, अहिल्यानगर. जाबदेणार ३) श्री– अविनाश बबनराव वाकचौरे. पत्ता :– ब्लॉक न.११, स्वप्नसाकार, पोलीस हौ.सोसा.अहिल्यानगर. | २०,९१,५४०/- |
| २ | १२८ ----- २०२५ | जाबदेणार १) श्री.सुभाष पिराजी कांबळे. पत्ता :– मु.पो.नगर–पुणे रोड, अंबिका हॉटेलमागे, केडगाव. ता/जि अहिल्यानगर, जाबदेणार २) श्री सतिष दासु कांबळे, पत्ता :– मु.पो. नगर–पुणे रोड, अंबिका हॉटेलमागे, केडगाव. ता/जि.अहिल्यानगर, जाबदेणार ३) श्री राजु अजिज शेख. पत्ता :– मु.पो. सोनेवाडी रोड, लोंढेमळा, केडगाव. ता/जि अहिल्यानगर. | २,०८,८०६/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दिनांक : २५/०२/२०२६

शिक्का

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अ.नगर



## हनुमान चालिसा पाठ

**सोमवार दि. ९/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**महात्मा ज्योतिबा फुले युवा प्रतिष्ठाण,** फुलसौंदर चाळ, बुरुडगाव रोड, किशोर फुलसौंदर ७५८८१७०२३३, शेखर फुलसौंदर ९६२३४९१३४९, पांडुरंग फुलसौंदर ९७३०२०५२५०

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**भवानीनगर मित्र मंडळ,** भवानीनगर, बंटी ससाणे ८२०८९४८२९४, पृथ्वी भदारगे ७०२०२७२६७३

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्री कपिलेश्वर मित्र मंडळ,** माळीवाडा वेश, ९८९०९३३९३५

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**नगरसेवक गणेशभाऊ कवडे मित्र मंडळ,** नाना पाटील वस्ताद तालीम, नालेगाव

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री रामदेवरा दरबार,** सारसनगर, ९८२२००९७८२

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### मुले हुशार होण्यासाठी...

मुलांनी प्रगती करावी अशी इच्छा सर्व पालकांना असते अशात त्याच्या खाण्या-पिण्याकडे दुर्लक्ष करता कामा नये कारण योग्य आहारामुळे मेंदू वेगानं काम करतं. तर मेंदूची शक्ती वाढवायची असेल तर मुलांना दररोज सुक्या मेव्यांमध्ये व्हिटॅमिन, कॅल्शियम, लोह, अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म असल्याने शरीराला सर्व आवश्यक घटक मिळतात. याने मेंदूचा विकास होतो. ड्रायफ्रूट्स खाल्ल्याने ताकद मिळते, एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढविण्यासाठी मदत होते. अक्रोडला तर ब्रेन फूड असेही म्हणतात. डार्क चॉकलेट खाल्ल्याने ताण कमी होतं ज्याने मेंदूवर चांगला परिणाम होतो. चॉकलेटमध्ये अँटी-ऑक्सिडेंट आढळतं. तसंच डार्क चॉकलेटमुळे मूड सुधारतं आणि एक्रागता वाढते. जेवण्यात ऑलिव्ह ऑइलचा समावेश करावा. ऑलिव्ह ऑइलमध्ये व्हिटॅमिन ई, के, खनिजे व अँटी-ऑक्सिडंट्स आढळतात. हे मेंदूच्या आरोग्यासाठी योग्य आहे. याने स्मरणशक्ती सुधारते. ऑलिव्ह ऑइलने मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते.

## पाककला

### ॲप्पल खीर

**साहित्य :** सफरचंद २, दूध १ लिटर, साखर १५० ग्रॅम, बदाम १०-१२, काजू ५-६, केशर, पिस्ता ५-६, मनुका १०-१५, छोटी वेलची ४

**कृती :** दूध घट्ट होईपर्यंत उकळवा आणि नंतर एका पॅनमध्ये जराश्या तुपात २ किसलेले सफरचंद परतून घ्या. दूध आणि सफरचंद एकत्र शिजवून त्यात साखर घालून एकत्र शिजवा. यानंतर ड्रायफ्रुटस् घालावे लागतील आणि नंतर ५ मिनिटे खीर शिजवा. आता ते थंड झाल्यावर एका भांड्यात काढून ड्रायफ्रुटस्‌ने सजवा.

## सल्ला

### असा वापरा जुना टूथब्रश

तुम्हीही तुमचा जुना टूथब्रश निरुपयोगी समजून फेकून देता का? जर असेल तर तुम्ही तो वापरण्याचे काही मार्ग शिकले पाहिजेत.

* टूथब्रश कापड किंवा तुमचा हात पोहोचू शकत नाही अशा लहान जागा स्वच्छ करण्यासाठी वापरला जाऊ शकतो. तुम्ही ते टाइल्समधील घाण साफ करण्यासाठी देखील वापरू शकता. जुन्या टूथब्रशला व्हिनेगर आणि बेकिंग सोडा लावा आणि घाणेरड्या भागावर घासून घ्या. यामुळे सर्व घाण सहजपणे निघून जाईल.

* जुना टूथब्रश शूजच्या तळव्या आणि कडांवरील धूळ सहजपणे साफ करू शकतो. जर तुम्ही केसांना मेंदी लावत असाल तर ते लावण्यासाठी तुम्ही जुना टूथब्रश देखील वापरू शकता. एक्झॉस्ट फॅन साफ करण्यासाठी टूथब्रश देखील वापरता येतो.

## वास्तू

* हिंदू धर्मात गाय पूज्यनीय आहे. गायीला मातेचा दर्जा दिलेला आहे. घरात पितळेची गाय ठेवणे हे शूभ मानले जाते. असे केल्यास जीवनात सुख तसेच समृद्धी मिळते.

* उंटाच्या मूर्तीलाही शूभ मानले जाते. ही मूर्ती घरात ठेवल्यास सूख, समृद्धी येते असे म्हटले जाते. ड्रॉईंग तसेच लिव्हिंग रुमम ध्ये ही मूर्ती उत्तर-पश्चिम दिशेला ठेवायला हवी, असे सांगितले जाते.

## सौंदर्य

त्वचेला मॉइश्चरायझिंग करणे खूप महत्वाचे आहे. यासाठी तुम्ही घरच्या घरी कोरफड वेरा जेल, गुलाबपाणी, खोबरेल तेल इ. मिसळून मॉइश्चरायझर बनवा आणि ते तुम च्या त्वचेवर लावा. यामुळे त्वचेवर कोणतीही समस्या उद्भवणार नाही. तुम्हाला बाहेरून म हाग उत्पादने घेण्याची गरज भासणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. ८ मार्च २०२६

**रंगपंचमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, स्वाती १३।३२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३६ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**वृषभ :** जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**सिंह :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**कन्या :** आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी

**तूळ :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**वृश्चिक :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**मकर :** घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**कुंभ :** आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**मीन :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

## शब्दगंध क्र. ७३८२ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | | | ■ | ८ | ■ | |
| | ■ | | ■ | ९ | | १० | |
| ■ | ११ | | ■ | १२ | | | ■ |
| १३ | | | ■ | | ■ | १४ | १५ |
| १६ | | ■ | १७ | ■ | १८ | | |
| ■ | | ■ | | ■ | | ■ | |
| १९ | | ■ | २० | | ■ | २१ | |

**आडवे शब्द :-** १) सारख्या स्वभावाचा ५) फणसाची एक जात ७) कमाई; आय ९) फटीतून येणारा प्रकाशकिरण ११) एक धान्य ज्याचे कणीस भाजून खातात १२) मुक्तता करणारा; सुटका करणारा १३) पांघरण्याचे एक वस्त्र १४) आशीर्वाद; नवरा मुलगा १६) मग्न; लीन; गुंग; रममाण १८) एक फळ १९) गुच्छ; समूह; घड; झुबका २०) नृपती; भूपती; राणीचा नवरा २१) समुद्रात शिंपल्यात सापडणारे एक रत्न

**उभे शब्द :-** १) होमाच्या उपयोगाचे इंधन २) हार; माला; डोंगराळ जमीन ३) नकला करणारा ४) थंड; गार; भाताचा प्रत्येक कण ६) अंघोळ न केलेला; शिळा ८) सालपट; आवरण; टरफल ९) उच्च प्रतीचा एक तांदूळ १०) गोंद वगैरे चिकट पदार्थ ११) मदतनीस १३) एक समसंख्या; वेदांची संख्या १५) जीभ; रसना; जिव्हा १७) पेटीसारखा मोठा करंडा १८) एक प्रकारचा झाडू; नागाने उगारलेला फणा

### शब्दगंध क्र. ७३८१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | स | द | ■ | स | दा | शि | व |
| र | र | ■ | उ | दा | ह | र | ण |
| क्ष | मा | शी | ल | ■ | ■ | ग | वा |
| क | ड | व | ट | ■ | व | ण | ■ |
| ■ | ■ | ■ | ■ | स | जा | ती | य |
| ग | ज | व | द | न | ■ | ■ | ज |
| स्त | ■ | प | क्ष | ■ | क | ल | मा |
| ■ | ज | न | ता | ■ | व | त | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जोपर्यंत पूर्ण सत्य माहित नसते तोपर्यंत शांत राहणच योग्य असते कारण पूर्ण असत्यापेक्षा अर्धसत्य जास्त घातक असतं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपल्या त्वचेचा रंग कसा ओळखावा?

तुम्ही अनेकदा लोकांना असे म्हणताना ऐकले असेल की कपडे नेहमी त्वचेच्या रंगानुसार घालावेत. यामुळे लूक चांगला येतो.पण त्वचेचा रंग कसा शोधायचा हे जाणून घेऊ या. त्वचेच्या रंगानुसार कपडे घालणे कितपत योग्य आहे? - त्वचेच्या रंगानुसार कपडे घालणे खूप चांगले आहे, पण ते अनिवार्य नाही. त्वचेच्या रंगाचा नियम पाळल्याने तुमचा चेहरा अधिक ताजा आणि चमकदार दिसू शकतो. योग्य रंगाचा पोशाख तुमचा संपूर्ण लूक संतुलित ठेवण्यास मदत करतो. यामुळे लूक खूप वाढतो. त्वचेचा रंग कसा ओळखायचा? आता तुमच्या त्वचेचा रंग कसा ओळखायचा हे जाणून घेण्याची वेळ आली आहे. प्रथम समजून घ्या की त्वचेचा रंग तीन प्रकारचा असतो. तुमच्या त्वचेचा रंग ओळखण्यासाठी, तुम्हाला तुमच्या मनगटावरील नसा पहाव्या लागतील. उबदार त्वचेचा रंग असलेल्या लोकांच्या मनगटावरील नसा हिरव्या दिसतात. जर तुमच्या नसा निळ्या किंवा जांभळ्या दिसत असतील तर तुमचा त्वचेचा रंग थंड आहे. दुसरीकडे, जर लोकांच्या मनगटावरील नसा हिरव्या आणि निळ्या दोन्ही दिसत असतील तर याचा अर्थ असा आहे की तुम्ही न्यूट्रल स्किन टोनमध्ये येत आहात. त्वचेच्या रंगानुसार फॅशन फॉलो करण्यापूर्वी, हे समजून घ्या की काय घालायचे आणि कसे घालायचे याचा निर्णय पूर्णपणे तुमचा असावा. जर तुम्हाला एखादा रंग आवडला आणि तुम्हाला तो चांगला वाटत असेल, तर तो सर्वोत्तम रंग आहे, मग तो त्वचेच्या रंगाशी जुळत असो वा नसो. आत्मविश्वासाने परिधान केल्यास प्रत्येक रंग चांगला दिसतो.


### अहंकारी गुलाब

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका वाळवंटात दोन झाडे होती, एक गुलाब आणि एक निवडुंग. गुलाब लाल रंगाचा होता आणि त्याच्या पाकळ्या सुंदर होत्या. त्याला तिच्या दिसण्याचा खूप अभिमान होता.

निवडुंग शांत राहिल्यावर गुलाब निवडुंगाच्या कुरूप दिसण्याची थट्टा करायचा. एकदा उन्हाळ्याच्या आगमनाने, वाळवंट कोरडे झाले आणि वनस्पतींसाठी पाणी शिल्लक राहिले नाही. पाण्याअभावी, गुलाब त्याचे सौंदर्य गमावू लागला. पण निवडुंग मात्र हिरवागार होता. गुलाबाने निवडुंगाकडे अशा प्रकारे पाहिले जसे पक्षी निवडुंगाला पाण्यासाठी चोचीने टोचण्याचा प्रयत्न करत आहे. गुलाबाला त्याच्या चुकीची लाज वाटली आणि निवडुंगाला पाणी मागितले. निवडुंग त्याला मदत करण्यास तयार झाला व गुलाबाला पाणी दिले.

तात्पर्य : कधीही कोणाच्याही दिसण्यावरून त्याचे मूल्यांकन करू नये. व कोणालाही कमी लेखू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



हम इसी क्षमता के साथ सत्गुरु से प्रार्थना कर सकते हैं, जो कि प्रभु से एकमेक है। क्योंकि वह शक्ति के केंद्र से जुड़ा हुआ है, अत: सत्गुरु हमारी इच्छाओं को पूरी करने में उतना ही समर्थ है। अपने शिष्यों के कर्मों को अपने हाथों में ५०. नामदान के समय, सत्गुरु ले लेता है; फलस्वरूप शिष्य को केवल सत्गुरू को जवाब देना होता है, कर्मों के देवता को नहीं। अब केवल बहुत थोड़े से कर्म बचते हैं, जिन्हें शिष्य को अपनी जिंदगी

### शरीर पर भुगतान

के बचे हुए सालों में अपने शरीर पर भुगतना होता है, पर ये भी सत्गुरु की दया से हल्के हो जाते हैं।

दुख परेशानी और बेचैनी के क्षणों में सत्गुरु ही हमारी ओट है। वह कितना भी दूर हो, अदृश्य होकर कार्य करता रहता है। वह हमें प्रेम के आलिंगन में थामे रखता है। एक स्नेही हृदय वाले शिष्य को मृत्यु के सजा के लिए किसी भी अदालत में नहीं जाना। सत्गुरु ही सब कुछ है !

५१. नामलेवा, सत्गुरु से अंतर में मिलता है, उससे आमने-सामने होकर बातें करता है और जैसे-जैसे वह इस रास्ते पर उन्नति करता है, वह नामदान के समय से ही, सत्गुरु की दया, संरक्षण और मार्गदर्शन अवश्य पाता है, चाहे वह कहीं भी जाए, चाहे दुनिया के दूसरे छोर तक ।

५२. सुनने लायक जीवन की धारा (श्रुति) नामलेवा का कवच है, यमदूत भी इसकी मौजूदगी से डरते हैं और नामलेवा के पास नहीं आ सकते, अगर नामलेवा एक जिंदा सत्गुरु का निष्ठावान शिष्य हो ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय : असे विचार आल्यामुळेच आपण ईश्वरविरोधी आणि कर्म- नियमविरोधी बनतो.

शिवानीदीदी : यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे, आपण स्वतःच्याच मविरोधात (अँन्टी- सेल्फ) जातो.

सुरेश ओबेरॉय : मी स्वतःच्याच विरोधात कसा जाईन ?

शिवानीदीदी : या विचारांची निर्मिती केल्या केल्या त्रास कोणाला झाला? स्वतःमध्ये क्रोध कोणी जागृत केला ?

सुरेश ओबेरॉय : भूतकाळात ती व्यक्ती माझ्याशी वाईट वागली म्हणून मी चिडलो. मी त्या माणसावर चिडलो आणि मला त्रास झाला.

शिवानीदीदी : त्याच्या भूतकाळातील वागण्यामुळे आत्ता, या क्षणी कोणाला राग येत आहे ?

सुरेश ओबेरॉय : त्याच्या वागण्यामुळे राग आला होता. त्या रागाला मी माझी

निर्मिती म्हणणार नाही. तो विचार माझ्या मनात आपोआपच आला.

शिवानीदीदी : तोच फोटो बघून दुसरा विचार करणं शक्य आहे का ? विचार कधी कोणत्याही बाह्य स्रोताकडून येत नाहीत.

सुरेश ओबेरॉय : हे विचार आधी, विशिष्ट परिस्थितीत निर्माण झाले. नंतर ते आठवणींत घर करून राहिले. आज जेव्हा पुन्हा मी त्या व्यक्तीचा फोटो बघितला तेव्हा ते परत उफाळून वर आले.

शिवानीदीदी : पण जे विचार आठवणीत दबले गेले त्या विचारांची निर्मिती पहिल्यांदा कोणी केली?

सुरेश ओबेरॉय : ते विचार तर त्या घटनेची निर्मिती होती.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

तीन मच्छर आपापसात बोलत होते... १ ला मच्छर : मी डॉक्टर बनणार.
२ रा मच्छर : मी इंजिनीयर बनणार आहे. ३रा मच्छर : मी वकील बनणार आहे. तितक्यात काकू मॉर्टिन लावतात :
तिन्ही मच्छर चिडून : हिच्या आईला... आख्ख्या करीअरची वाट लावली.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* टाईम मासिकाने वूमन ऑफ दि इयर २०२५ मध्ये निवड केलेल्या पूर्णिमा बर्मन कोणत्या राज्यातील आहेत? - आसाम

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'प्रिय नयना...'

मध्यरात्री त्याला जाग आली. नंतर बराच वेळ झोप लागली नाही. त्याच्या मनात आलं आज नयनाचा वाढदिवस. सहजीवन प्रवासाची दहा वर्षे खुपच छान गेली. कारण नयना. समजुन घेणारी, न रागावणारी, न चिडणारी, न वैतागणारी. दहावर्षांपूर्वी माझ्या मनात विचार यायचा - मी जन्मापासून अंध. कसं होणार माझं ? मला जीवनसाथी मिळेल की नाही ? मिळाली तर कशी असेल ती ?... तो खूप वेळ शांतपणे पडुन राहिला. त्याच्या मनात आलं नयनाविषयी व्यक्त व्हायचं. विशाल मनाच्या कागदावर त्यानं, तिला पत्र लिहायल घेतलं- प्रिय नयना, घरातले म्हणतात नयना खुपच सुंदर आहे. नयना, मी स्वतः कसा आहे हे मलाच माहित नाही. तु सुंदर आहेस मनाने. मोठ्या मनाने तू मला पती म्हणून स्वीकारलंस. तुझे हे ऋण मी ह्या जन्मात फेडु शकणार नाही. तू फक्त मनाने सुंदर नाहीस तर वागण्याने, बोलण्याने सुध्दा सुंदर आहेस. लाल, हिरवा, गुलाबी, निळा ही रंगांची फक्त नावं मी ऐकली आहेत. पण माझ्या अंधारल्या आयुष्यात तुझ्या येण्यामुळं जगण्याचा जो प्रकाश मिळाला त्यामुळेच मी छानसं जगु शकतो. तू माझं सर्वस्व आहेस. तू नसतीस तर ? हा विचार मला वेदनादायी वाटतो. तु माझ्यावर कधीच रागावली नाहीस, चिडली नाहीस, वैतागली नाहीस की कधी अबोलाही धरला नाहीस. एकदा माझ्या हातावर झाडाचं पान दिलं होतस तू आणि दुसऱ्या हातात गुलाबाचं फुल. तु म्हणाली होतीस रंगीबेरंगी फुलं पाहण्याचं भाग्य मलाही मिळालं असतं तर जगणं अधिकच खुमासदार, सुंदर झालं असतं. त्या गुलाबाची एकेक पाकळी माझ्या हातावर ठेवलीस तु. खरं तर तो क्षण तु मोबाईलमध्ये कैद केलास व्हिडिओ काढुन. जेव्हा जेव्हा तो व्हिडिओ तु पाहतेस तेव्हा तेव्हा म्हणतेस मला दृष्टी असायला हवी होती. अगदी मनमोकळं रडुन घेतेस तु. मलाही भडभडुन येतं. नयना, तुच माझे डोळे आहेस. तुला जे जे दिसतं ते ते तू सांगतेस . तु म्हणाली होतीस गुलाबी रंग प्रेमाचं प्रतिक आहे. खरं तर माझ्या जीवनाचा गुलाबी रंग तुच आहेस. तुला एकदा विचारलं होतं- माझ्याशी का लग्न केलस तु? - तु उत्तरली होतीस - तुझे डोळे होऊन तुला आयुष्यभर साथ द्यावी हे तुझ्या मनाने तुला सांगितलं. बघना, जे दिसत नसतं त्याचं आपण मनापासून ऐकतो. आज तुझा वाढदिवस. सांगना काय गिफ्ट देऊ तुला ?... 'झोप लागत नाहीय का?' तिच्या प्रश्नामुळे तो वास्तवात आला. हळुवार ऊठुन बसला. ती सुध्दा उठुन बसली 'कसला तरी विचार करतोहेस तु.' तो म्हणाला, 'तुझाच विचार करतोय मी. आज तुझा वाढदिवस. आठ मार्च. किती छान योगायोग महिला दिन आणि तुझा वाढदिवस एकाच दिवशी. तुझ्या शब्दांचा, तुझ्या स्पर्शाचा, तुझ्या अस्तित्वाचा आधार म्हणजे माझं जगणं आहे. तुझ्या डोळ्यांनी जे पाहिलं ते माझं जग आहे. तुझे उपकार मी ह्या जन्मातही फेडु शकणार नाही.' नयनाने, त्याचा हात, स्वतःच्या हातात घेतला. म्हणाली, नयना ह्या माझ्या नावाला मी खऱ्या अर्थाने न्याय दिला. तुझे डोळे होण्याचं भाग्य मला लाभलं म्हणुन मी स्वतःला भाग्यवान समजते. तू हे जग पाहु शकत नाहीस ह्याच मला वाईट वाटतं. तुला खरंच डोळे पाहिजे होते. ही अत्यंत सुंदर, मनमोहक सृष्टी तुला पाहता आली असती. नदी, समुद्र, झाडं, फुलं, चंद्र, सूर्य, लहान - निरागस मुलं तुला पाहता आली असती. पण परमेश्वर तुझ्यासोबत क्रुरपणे वागला.' तो म्हणाला, 'नयना, परमेश्वराला दोष देऊ नकोस. तो कृपाळु आहे, दयाळु आहे. त्याने तुला माझ्या जीवनात दिलं ह्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतो. नयना, माझ्यासाठी तुच परमेश्वर आहेस. माझं हे अंधार भरलं जीवन तुझ्या येण्यामुळे प्रकाशमान झालं आहे.' ती म्हणाली, 'मला परमेश्वर समजु नकोस. माणूस म्हणून जन्म मिळालं हे आपल्यासाठी भाग्याचं आहे. सांगना माझ्याविषयी काय विचार करत होतास. तो म्हणाला, ' मनातल्या मनात तुला पत्र लिहिलं, प्रिय नयना...' तिच्याविषयी काय लिहिलं हे सांगितलं त्याने. तिच्या डोळ्यांत आसवं तरळली. एक अश्रू त्याच्या हातावर पडला. त्याला समजलं. म्हणाला, 'तु माझ्या आयुष्यात नसतीस तर माझं जगणं मला वेदनादायी झालं असतं.' ती म्हणाली, 'माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. माझ्या ह्या दोन डोळ्यांमुळे दोन अंधांना दृष्टी येईल. मी पुन्हा जग पाहिन, ही सुंदर सृष्टी पाहिन.' तो म्हणाला, 'अत्यंत चांगला संकल्प केला आहेस तु. तु एवढ्या मोठ्या मनाची कशी आहेस?' ती म्हणाली, 'अंधांविषयी मला मनापासुन वाईट वाटतं. त्यांच्यासाठी काही चांगलं असं करावं असं मनापासुन वाटतं तेच मी करतेय.' ती बोलते आहे, तो ऐकतो आहे. प्रिय नयनाला स्वतःच्या नजरेत सामावण्याचा प्रयत्न करतो आहे तो.

(लेख क्र.५९१)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### करवंदे

याच्या सेवनाने कोणताही दुष्परिणाम न होता पौष्टिक घटक मिळाल्याने आरोग्य चांगले राहते. म्हणून हा रानमेवा सर्वांनी आवर्जून खावा. सहसा मोठ्या शहरांमध्ये हा रानमेवा मिळत नसल्यामुळे बरेचजण याच्या स्वादापासून व यामधून मिळणाऱ्या पौष्टिक घटकांपासून वंचित राहतात. रक्ताच्या कमतरतेमुळे जर अशक्तपणा जाणवत असेल, तर ऋतूमध्ये रोज मूठभर करवंदे खावीत. याने नक्कीच रक्ताची कमतरता भरून येईल. करवंदांमध्ये क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्याने त्वचाविकारामध्ये करवंदे सेवनाचा फायदा दिसून येतो. तसेच क जीवनसत्त्वामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्तीदेखील वाढते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिरात 'समर्थ महिला दिन' साजरा करण्यात आला.

# घरातूनच स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात झाली तरच सशक्त समाज घडेल

**डॉ. प्रीती भोंबे यांचे प्रतिपादन; समर्थ विद्या प्रसारक मंडळात 'समर्थ महिला दिन' उत्साहात**

नगर – घरातूनच स्त्री–पुरुष समानतेची सुरुवात झाली पाहिजे. महिलांचा सन्मान आणि त्यांना समान संधी दिल्यास समाज अधिक सशक्त बनेल. महिला दिन साजरा करताना केवळ महिलांनी नव्हे तर पुरुषांनीही सहभागी होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन स्नेहालयाच्या मानस सचिव डॉ. प्रीती भोंबे यांनी केले. स्त्री–पुरुष समानतेचा विचार समाजाने मनापासून स्वीकारला तरच प्रगतीशील आणि सुदृढ समाजव्यवस्था उभी राहू शकते, असेही त्यांनी सांगितले.

समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिरात 'समर्थ महिला दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास स्नेहालयाच्या मानस सचिव डॉ. प्रीती भोंबे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संस्थेचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी परिसरातील अंगणवाडी सेविका, सांगळे गल्लीतील प्राथमिक व माध्यमिक विभागातील शिक्षिका तसेच शाळेतील माता–पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संचालक स्वप्निल कुलकर्णी, संचालक सुनील जोशी, मुख्याध्यापक अजय महाजन उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. प्रीती भोंबे यांनी प्रथम संस्थेचे आभार मानले. त्या म्हणाल्या की, महिलांनी प्रत्येक वेळेस 'सुपर वुमन' होण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही. आयुष्यातील संघर्ष एकट्याने करण्याऐवजी कुटुंबीयांची साथ घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. महिला सक्षम होण्यासाठी कुटुंब, समाज आणि संस्थांची साथ मिळणे आवश्यक असून महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

पुढे त्या म्हणाल्या की, यावर्षीच्या महिला दिनाची 'गिव्ह ॲण्ड गेन' ही संकल्पना समाजासाठी मार्गदर्शक आहे.

शिशुविहार शाळेच्या सुनीता देव यांनी संस्थेच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. संस्थेचे माध्यमिक विभाग शाळा समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार केला.

अध्यक्षीय समारोपात श्रीपाद कुलकर्णी यांनी सांगितले की, आजच्या युगात संस्कृती आणि विज्ञान यांचा संगम साधणाऱ्या 'नवदुर्गा'सारख्या सक्षम महिलांची समाजाला गरज आहे. महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि समाजात सकारात्मक विचार रुजवण्यासाठी संस्थेच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक सुनील कानडे यांनी केले. त्यांनी शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी शारदा होशिंग, हेमलता शिंदे, जयश्री काळे आणि ज्योती मानकर या शिक्षकांनीही मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचलन संदीप गायकवाड आणि किशोर महाजन यांनी केले. रंगनाथ देशमुख यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## नाटक दृकश्राव्य आणि रूपक

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




संस्कृत साहित्यात नाटक आणि नाटककार ही संकल्पना खूप व्यापक अर्थांनी आली आहे. नाटककार हा केवळ नाट्यलेखक नसून तो कवी आहे आणि नाटक ही केवळ संवादात्मक गद्यरचना नसून ते एक महाकाव्यही आहे. संस्कृत साहित्यात भास हा नाटककार म्हणून ख्यात असला तरी भास हा महाकवी म्हणूनही संबोधला गेला आहे.

भासाचे स्वप्न वासवदत्त ही नाट्यकृती अजरामर ठरली आहे. इ.स. १९१० साली टी. सी. गणपतीशास्त्री हे विद्वान संशोधक पूर्वीच्या त्रावणकोक संस्थानात ग्रंथाचे संशोधन करीत असताना पद्मनाथ पुराजवळ मनाल्लीकर मठात त्यांना ३०० वर्षांपूर्वीचे मल्याळी लिपीतील जुने ग्रंथ सापडले. त्यात भासाची १३ नाटके भूर्जपत्रावर लिहिली होती. 'मृच्छकटिक' हे सर्वात प्राचीन नाटक समजले जाते. कालिदासाचे मालवीकाग्निमित्रम् विक्रमोवशीय आणि अभिज्ञान शाकुंतल ही नाटके संस्कृत नाट्यसृष्टीला उंचीवर नेऊन ठेवतात. या नाटकांमुळेच काव्येशु नाटकं रम्यं तत्ररम्या शकुंतला! हे वचन नाट्यपरंपरेत रूढ झाले. संस्कृत साहित्यात नाट्य आणि काव्य ही उत्तुंग प्रतिभेची दर्शने आहेत. संस्कृत साहित्यात नाटक हे साहित्याचे असे एक अंग आहे की त्यात काव्य डोळ्यांनी पाहता येते. काव्यातील पात्रांसाठी मनोभूमिकेवर जसा कल्पनेने रंगमंच करावा लागतो तशी नाटकाला गरज नसते. तिथे कलेचा रंगमंच उभा असतो. म्हणून नाटकाला दृकश्राव्य आणि रूपक दृश्यकाव्यही म्हटले जाते. नाटकाला साहित्यशास्त्रात रूपक असे म्हणतात. संत एकनाथ महाराजांनी भारुडाच्या माध्यमातून लोकांमध्ये रूढ असणारी अनेक रूपके मांडली आणि वासुदेव, गोंधळी, बैरागी, वेडा, मुका एडका, विंचू अशा बहुविध रूपकांमधून अंगणा–अंगणात रंगमंच उभा केला. नाटकात पात्रांचा अभिनय घडविणारा प्रसंग आणि रंगमंच पाहायचा असतो आणि पात्रांचे संवाद आणि संगीत ऐकायचे असते. त्यापैकी जे दृश्य असते तेच प्राधान्य करून अभिनय असते. या अभिनय दृश्यांचे मूळ नाव रूपक असे आहे. एका अर्थाने नाटक हे महाकाव्यच आहे. भरताने नाटकाचे लक्षण सांगताना म्हटले आहे की देवता मनुष्य, राजे आणि लोकप्रसिद्ध महात्मे यांच्या

'पूर्ववृत्तानुचरितं नाटकं नाम तद्भवेत!'

पूर्ववृत्ताचे अनुकरण म्हणजे नाटक होय. कोणत्याही कलाकृती या एकीकडे मनोरंजनासाठी तर दुसरीकडे समाजाला ज्ञान देण्यासाठी उभ्या असतात. त्या दृष्टीने अभिज्ञान, अभिनय आणि अभिव्यक्ती यांचे एकत्रीकरण म्हणजे नाटक होय. नाटक नसते तर मानवी मन व्यक्तही झाले नसते आणि मुक्तही झाले नसते. त्यासाठी संवाद पहावा लागतो. हा संवाद जेव्हा पात्रापात्रांशी आणि रसिकांशी होतो तेव्हा दृश्य रंगमंच उभा राहतो आणि हा संवाद जेव्हा स्वगत स्वरूपात मनाशी संवाद घडवितो तेव्हा मानवी मनातही एक अदृश्य रंगमंच साकारतो.

**– किशोर गांधी**

# सुंदर गृह सजावटीसाठी 'अरिहंत होम'मध्ये महिला दिनानिमित्त डेकोरमध्ये खास व्हरायटी



सौ. शिल्पा मुनोत



सौ. रिशिता मुनोत

नगर – घरातील बेडरुमपासून किचन, हॉलपर्यंत सगळीकडे आकर्षक फर्निचर नक्कीच केले जाते. या फर्निचरला कारपेट, वॉलपेपर, मॅट्रेस, पडद्यांची जोड मिळाल्यास घराची सुंदरता वाढते. अशा वातावरणात वास्तव्य करणे संपूर्ण कुटुंबासाठी खूप आनंददायी असते. विशेषत: महिला घराच्या सुंदर सजावटीसाठी विशेष चोखंदळ असतात. त्यामुळे महिला दिनानिमित्त सावेडी पंकज स्टील कंपाउंड येथील अरिहंत होम डेकोर येथे घराचे सौंदर्य वाढविणारी मोठी रेंज उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती सौ. शिल्पा व सौ. रिशिता मुनोत यांनी दिली.

अरिहंत होम डेकोर हे गृहसजावटीसाठी लागणारे पडदे, मॅट्रेस, वॉलपेपर, कारपेटसाठी प्रसिध्द आहे. मॅट्रेसच्या अनेक ब्रॅण्डेड व्हरायटी येथे आहेत. आरामदायी आणि दिसायलाही सुंदर अशा मॅट्रेसमुळे निवांतपणाची अनुभूती येते. घरातील रूमला असलेला रंग व त्याला अनुरूप असे पडदेही येथे आकर्षक व्हरायटीत उपलब्ध आहेत. भिंतीवर लावण्यासाठी वॉलपेपर घराची शोभा वाढवणारे आहेत. कारपेटचीही अतिशय दर्जेदार आणि मोठी रेंज अरिहंत होम डेकोर मध्ये आहे. आपल्या पसंतीनुसार ग्राहकांना चोखंदळपणे खरेदी करता येते.

अधिक माहितीसाठी ८४८४८३२५७७ या नंबरवर संपर्क साधावा.

# महिला दिनानिमित्त मोफत स्तन व गर्भपिशवी कर्करोग तपासणी शिबिराला प्रतिसाद

**पद्मशाली स्नेहिमा संघम व निमा वुमन्स फोरमचा उपक्रम; शंभरहून अधिकांची तपासणी; कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंध आणि एचपीव्ही लसीबाबत तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन**






नगर – आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने पद्मशाली स्नेहिमा संघम आणि निमा वुमन्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्यासाठी स्तनाचा व गर्भपिशवीचा कर्करोग याबाबत मोफत तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराला महिलांचा प्रतिसाद मिळाला. शिबिरात महिलांची तपासणी करून स्तनाचा तसेच गर्भपिशवीचा कर्करोग टाळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

अलिकडच्या काळात महिलांमध्ये स्तनाचा व गर्भपिशवीचा कर्करोगाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या गंभीर आजाराबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण व्हावी आणि वेळेवर तपासणी करून रोगाचे लवकर निदान व्हावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात पद्मशाली स्नेहिमा संघमच्या अध्यक्षा डॉ. रत्नाताई बल्लाळ, डॉ. अंशू मुळे आणि डॉ. मानसी कांबळे यांनी कर्करोगाची कारणे, लक्षणे, त्यावरील उपचार तसेच वेळेवर निदानाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून नियमित तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी डॉ. कांचन रच्चा यांनी गर्भपिशवीचा कर्करोग टाळण्यासाठी दिली जाणारी एचपीव्ही व्हॅक्सिन (HPV) लस, तिचे डोस आणि वयानुसार ती कशी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती दिली. कर्करोग पहिल्या टप्प्यात ओळखला गेला तर तो पूर्णपणे बरा होऊ शकतो, असे सांगत त्यांनी स्त्रियांनी स्वतः स्तनाची तपासणी कशी करावी याचे प्रात्यक्षिकही दाखवून दिले. तसेच शिबिरात उपस्थित सर्व महिलांची गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी करण्यात आली.

या शिबिरात डॉ. अंशू मुळे, डॉ. मानसी कांबळे, डॉ. कांचन रच्चा, डॉ. रत्ना बल्लाळ, डॉ. प्रेरणा छिंदम, डॉ. प्रांजल आडेप आणि डॉ. प्रीती सुरकुटला यांनी महिलांची तपासणी केली. जवळपास शंभरहून अधिक महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी पद्मशाली स्नेहिमा संघमच्या उपाध्यक्षा रेखा वडेपल्ली, सचिव सपना छिंदम यांच्यासह पुनम वन्नम, साधना कोळपेक, नीता बुरा, विजया गुंडू, प्रमिला वन्नम, सविता एक्कलदेवी, आरती छिंदम, सरोजा गुडा, रोहिणी पागा, कांचन कुंटला, कल्पना बुलबुले, सविता कोठारी, रेखा गरुड, ऐश्वर्या अंकाराम, सविता येनगुंदुल, निर्मला गुंडू, सरू रच्चा, लक्ष्मी गुंडू, प्रमिला चिल्का आदी उपस्थित होत्या.

# रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात केल्यास महिला आत्मनिर्भर होतील

**महापौर ज्योती गाडे यांचे प्रतिपादन; आय.एस.डी.टी.मध्ये टाय ॲण्ड डाय कार्यशाळा**

नगर – महिलांनी रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात केल्यास त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि आत्मनिर्भर होतील, असा विश्वास अहिल्यानगरच्या महापौर सौ. ज्योती गाडे यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी.टी.) या संस्थेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने जलतरंग ही टाय अ‍ॅन्ड डाय (बांधणी) या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी सौ.गाडे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आय. एस. डी. टी. चे संस्थापक विनायक देशमुख होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख, प्राचार्य अरुण गावडे, फॅशन डिझाईन विभाग प्रमुख पुजा पतंगे, स्मिता बडाख, पूर्वा भंडारी, कोमल वांढेकर, रोहन चारगुंडी आदी उपस्थित होते.



अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी.टी.) या संस्थेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने जलतरंग ही टाय ॲण्ड डाय (बांधणी) या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महापौर सौ. ज्योती गाडे म्हणाल्या, आजची महिला प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असून धडाडीने काम करत आहे. स्वतःचा आत्मसन्मान टिकविण्यासाठी महिलांनी आर्थिक दृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येक मुलीने व महिलेने रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात करून आत्मनिर्भर व्हावे,.

यावेळी बोलताना विनायक देशमुख म्हणाले, महिला आणि मुलींना रोजगाराभिमुख कौशल्य शिक्षण देण्यासाठी २००४ साली एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाची संलग्नता घेऊन आय.एस.डी.टी. संस्था स्थापन करण्यात आली. संस्थेमार्फत डिप्लोमा इन इंटेरियर डिझाईनिंग व डिप्लोमा इन फॅशन– टेक्सटाइल डिझाईनिंग हे दोन अभ्यासक्रम चालविले जातात. आतापर्यंत संस्थेतून ५००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केले असुन हे विद्यार्थी त्यांच्या क्षेत्रात चांगली कामगिरी करत आहेत. फॅशन डिझायनिंगच्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात डाईंग, ब्लॉक प्रिंटिंग, स्क्रीन प्रिंटिंग, बाटीक, फायबर टु फॅब्रिक, ४० पेक्षा जास्त प्रकारच्या एम्ब्रॉयडरी, आरी वर्क, क्रोशेटींग, मिरर वर्क, मार्केटिंग, फॅब्रिक सिलेक्शन, पॅटर्न बेकींग, मशीन एम्ब्रॉयडरी अशी १० ते १२ प्रकारचे कौशल्ये शिकविले जातात. संस्थेच्या अनेक विद्यार्थीनी सध्या महिन्याला रु.१,००,००० पेक्षा जास्त उत्पन्न कमावित आहेत. २०२६/२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून किमान दहावी उत्तीर्ण असलेल्या मुली व महिला या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात.

या कार्यशाळेत शहरातील १५० पेक्षा जास्त महिला सहभागी झाल्या होत्या. या महिलांना प्रथम बांधणी या विषयाचे व नंतर रंगकाम या विषयाचे प्रशिक्षण देऊन प्रात्यक्षिक घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक फॅशन डिझाईन विभाग प्रमुख पुजा पतंगे यांनी केले. सूत्रसंचालन पूर्वा भंडारी यांनी तर आभारप्रदर्शन स्मिता बडाख यांनी केले.

# बालक मंदिर महिला मंडळातर्फे महिला दिनानिमित्त ११ मार्चला 'पाककला स्पर्धेचे' आयोजन

नगर – दिल्लीगेट येथील महिला मंडळ बालक मंदिर शाळेतर्फे सर्व महिलांसाठी महिला दिनानिमित पाककला स्पर्धा आयोजित केली आहे.

११ मार्च रोजी दुपारी ३ वाजता बालक मंदिर महिला मंडळ दिल्लीगेट शाळेत स्पर्धकांनी घरून तयार करून आणलेला पदार्थ आणि लिहून आणलेला रेसिपीचा कागद मांडायचा आहे. दुपारी ३ ते ३.३० एवढाच वेळ मांडणी व सजावट यासाठी मिळणार आहे.

स्पर्धेसाठी विषय 'मुलांसाठी पौष्टिक डबा गोड किंवा तिखट पदार्थ' हा असून प्रत्येक पदार्थासाठी शुल्क २० रु. ठेवण्यात आले आहे. स्पर्धेनंतर लगेच बक्षीस समारंभ होईल. अधिक माहितीसाठी ज्योती केसकर ९४०५१३६४३८, विद्या होळेहोन्नूर ९९२३०४७४३१, शिल्पा रसाळ ९८६००६७५७५, अस्मिता शूळ ९८८११६५६८०, अश्विनी मेंद्रे ९८६०७२३९६४.

# वाडिया पार्क जलतरण तलावात समर कॅम्प सुरू; लहान मुलांपासून महिलांसाठी विशेष स्वतंत्र बॅच




नगर – जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथील जलतरण तलाव नागरिकांसाठी उत्तम सुविधा देत असून येथे १ मार्चपासून समर स्विमिंग कॅम्प सुरू करण्यात आला आहे. लहान मुले, युवक–युवती तसेच महिलांसाठी स्वतंत्र बॅचची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

१ ऑक्टोबर २०२५ पासून साई स्विमिंग ॲकॅडमीच्या माध्यमातून हा जलतरण तलाव नागरिकांच्या सेवेसाठी सुरू असून ब्लू फ्लाय पुल फाऊंडेशनच्या संस्थापिका सारिका ललित गांधी आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक सर्वेश भगवान देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण व्यवस्थापन केले जात आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून जलतरण तलावातील पाण्याची शुद्धता, स्वच्छता आणि व्यवस्थापन उत्तम प्रकारे राखले जात असल्यामुळे नागरिकांकडून या उपक्रमाला प्रतिसाद मिळत आहे. पोहणे शिकण्यासाठी प्रशिक्षित व प्रमाणित प्रशिक्षकांची टीम येथे कार्यरत आहे. सकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत विविध बॅचेसद्वारे प्रशिक्षण दिले जाते.

या ॲकॅडमीमध्ये मॅनेजर हर्षद दगडे, कॅशियर अथर्व गंगावने, प्लांट ऑपरेटर शांतू कटिमनी, तसेच प्रशिक्षक लोकेश पासवान, ओमकार मिसाळ, दिलीप गोसावी आणि राष्ट्रीय प्रशिक्षक संजित पासवान व महिला प्रशिक्षक विश्वेषा मिस्किन यांचा समावेश आहे. याशिवाय अनुभवी लाईफगार्ड संघर्ष सोळसे, समर्थ सकट व सहाय्यक कर्मचारीही वैशाली वाल्मीक, विकास साठे कार्यरत आहेत.

**जलतरण तलावाची प्रमुख वैशिष्ट्ये :** शुद्ध व निर्जंतुक स्वच्छ पाणी, अनुभवी स्विमिंग ट्रेनरकडून वैयक्तिक प्रशिक्षण, शिकाऊंसाठी किक बोर्डची सुविधा, पालकांसाठी प्रशस्त बसण्याची व्यवस्था, लहान मुलांसाठी बेबी पूल, महिलांसाठी स्वतंत्र बॅच, अनुभवी लाईफगार्डची व्यवस्था, मोठी पार्किंग सुविधा, मासिक मेंबरशिपची सोय, प्रगत प्रशिक्षणासाठी NIS कोचचे मार्गदर्शन

जलतरण तलावात उतरण्यापूर्वी शॉवर घेणे आवश्यक आहे. पोहण्याचे कपडे घालणे बंधनकारक आहे. पादत्राणे बाहेर काढणे आवश्यक आहे. परिसरात मावा, गुटखा, पान किंवा तंबाखू खाऊन थुंकण्यास मनाई आहे. प्रत्येक सभासदाने प्रवेशासाठी तिकीट किंवा ॲडमिशन घेणे आवश्यक आहे. प्रत्येक बॅच ४५ मिनिटांची असेल. नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येईल.

माहितीसाठी जिल्हा क्रीडा संकुल जलतरण तलाव, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आले आहे.


# स्वादसेवेतील अग्रणी



शिलाताई बोरा



मयुरी बोरा

कोणत्याही मंगल कार्यावेळी घरांत चर्चा सुरू होते ती केटरिंग सेवेची. पाहुण्यांना स्वादिष्ट भोजनाने तृप्त करणारी केटरिंग सेवा निवडली जाते. नगरमध्ये या स्वाद सेवेतील अग्रणी नाव म्हणजे हेमराज केटरर्स..

अनेक वर्षांपासून हेमराज केटरर्सची रूचकर चव आणि खास दिवाळी फराळाचा आस्वाद ग्राहक घेत आहेत. या चवीला खास सुगरण हात मिळालेत ते शिलाताई बोरा यांचे. पती स्व. हेमराज बोरा यांना तोलामोलाची साथ देत त्यांनी एक महिला भाग्यलक्ष्मी कशी ठरू शकते हे दाखवून दिले आहे. हेमराज बोरा यांनी सुरु केलेल्या किराणा दुकानाच्या व्यवसायापासून ते केटरर्सच्या व्यवसायापर्यंतच्या प्रवासात शिलाताई यांनी मोठे योगदान देत उत्कर्षात सिंहाचा वाटा उचलला आहे. अनेक वर्षांपासून हेमराज केटरर्स रूचकर दिवाळी फराळही उपलब्ध करून देत आहेत. नगरसह परजिल्ह्यातील ग्राहक हा फराळ नेण्यासाठी येतात. या फराळाला घरचा स्वाद आणि आईची माया देण्याचे काम शिलाताई बोरा करीत असतात. त्यांना तितकीच तोलामोलाची साथ मिळते सूनबाई मयुरी प्रसन्न बोरा यांची. सासू सुनेची ही जोडी बोरा परिवाराच्या कोहिनूर ठरल्या आहेत.


जवळपास १५० कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेताना त्या रात्रंदिवस मग्न असतात. त्यामुळेच हेमराज बोरा हे आपल्या धर्मपत्नीला यशस्वितेची खरी वाटेकरी आणि भाग्यलक्ष्मी मानतात.

आष्टी तालुक्यातील देवळाली पानाची या गावी माहेर असलेल्या शीलाताई बोरा यांच्या घरी वडीलांचे किराणा दुकान होत. सहा बहिणभाऊ असलेल्या परिवारात खूप शिक्षण घेता आले नाही. पण व्यावहारिक शिक्षणाचे बाळकडू त्यांना माहेरी निश्चितच मिळाले. ॲड. संतोष बोरा यांनी आपले लहान बंधू हेमराज बोरा यांच्यासाठी शीलाताई यांचे स्थळ निश्चित केले व १९८५ ला त्या बोरा परिवारात सून म्हणून आल्या. सुरुवातीची चार वर्षे पिंपळगावला त्यांनी आपल्या सासूंची पोटच्या मुलीप्रमाणे सेवा केली. या दरम्यान नगरला ख्रिस्त गल्लीत हेमराज बोरा यांनी हेमराज किराणा दुकान सुरु केल्यापासून त्यांनी पतीला व्यवसायात साथ देण्यास सुरुवात केली. कष्टाला नाही म्हणायचे नाही आणि ग्राहकाला जो माल द्यायचा तो अतिशय गुणवत्तेचा असला पाहिजे असा त्यांचा कायम कटाक्ष राहिला आहे. पुढे जैन सोशल फेडरेशनचे डॉ. राजेंद्र चंगेडिया व वर्षा चंगेडिया यांनी बोरा परिवाराला केटरिंग व्यवसायात उतरण्यास प्रेरित केले. बोरा यांनीही हे आव्हान स्वीकारत या क्षेत्रात स्वतःच ब्रॅण्ड तयार केला. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज, प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्यावर त्यांची नितांत श्रध्दा आहे. त्यांच्या कृपाशिर्वादानेच कौटुंबिक व व्यावसायिक भरभराट झाल्याचे त्या आवर्जून सांगतात. आपली मुले विश्वजीत व प्रसन्न तसेच सून मयुरी यांनाही त्यांनी व्यावसायिक हातोटीचे गुण व संस्कार दिले आहेत. कुटुंबात अतिशय धार्मिक वातावरण आहे. हेमराज फार्म येथे साधूसंतांचे स्वागत, सेवा करण्यात संपूर्ण कुटुंब लीन होते. मयुरी बोरा या चातुर्मास काळात खडतर असे उपवास करतात.

शिलाताई कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच कामगारांचीही आईच्या मायेने काळजी घेतात. सामाजिक, धार्मिक कार्यातही त्या योगदान देतात. जैन सोशल फेडरेशनच्या उपक्रमांत त्यांचे योगदान असते. याशिवाय कोणाच्या घरी मयत झाल्यास त्यांच्याकडे मागणीनुसार दाळपाणीचा डबा पोहोच केला जातो. कोणी पैसे देवू केल्यास ते पैसे आनंदऋषीजी हॉस्पिटल किंवा पांजरापोळ गोरक्षण संस्थेच्या कार्यासाठी देण्यात येतात. मागील वर्षी हेमराज बोरा यांचे दुर्दैवी निधन झाले. यानंतरही शिलाताई बोरा यांनी खंबीरपणे आपल्या पतीने सुरू केलेल्या व्यवसायातील आपले योगदान चालूच ठेवत तितक्याच आत्मीयतेने स्वाद सेवा सुरू ठेवली आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त शिलाताई बोरा, मयुरी बोरा यांच्या कर्तृत्वाला सलाम आणि मनापासून शुभेच्छा. (द्वारा – पिंटू पब्लिसिटी)

# कॉम्पॅक्टर अथवा धुम्मसचा वापर भक्कम प्लिंथसाठी आवश्यक

















**आवश्यकता :** आपण बंगल्याच्या कामास सुरुवात केल्यानंतर प्लिंथ लेव्हलला मुरूम भर केल्यानंतर तो चांगला दाबून बसण्यासाठी धुम्मस करणे आवश्यक असल्याचे इंजीनिअर अथवा कॉन्ट्रॅक्टर सांगत असल्याचे ऐकण्यात असेल. जमिनीतील माती अथवा मुरूम आपण खोदुन काढल्यावर ती तिच्या घनतेच्या दिड पटीपेक्षा जास्त जागा व्यापते हे आपणास माहिती आहे. कारण ती माती भूसभूसित किंवा मोकळी झालेली असते अश्या मोकळ्या मुरुमाची भर टाकून ती व्यवस्थित चोपून न घेता त्यावर बेड काँक्रीट व फ्लोअर काम केल्यास भविष्यात ती खचण्याचे प्रमाण सर्वाधिक असते. त्यामुळे प्लिंथ लेव्हलला अथवा बिल्डींग साईड मार्जिनमध्ये भर टाकल्यावर त्याची दबाई करून घेणे आवश्यक असते.

बांधकाम क्षेत्रात काम करताना काळ्या मातीची जमीन असलेल्या ठिकाणी हमखास फरशी खचली किंवा मार्जिन मधील बेड काँक्रीट लेव्हल वर खाली झाली या तक्रारी नेहमी ऐकावयास मिळतात.

**उपाय :** वरील अडचणी टाळण्यासाठी दोन गोष्टी प्रामुख्याने करणे आवश्यक आहे.

१) प्लिंथ लेव्हल भरण्यासाठी हार्ड मुरुमाचा वापर करून त्यावर धुम्मस वापरणे आणि त्याचा पृष्ठभाग व्यवस्थित कॉम्पॅक्ट करणे.

२) बेड काँक्रीट आधी डबराचा वापर करून सोलिंग करणे. यामुळे प्लिंथ खालील जमीन खचण्यास अटकाव तर होतोच त्याचबरोबर डॅम्पप्रूफ कोट मुळे वाळवी लागणे भिंतीत ओलावा येणे हा त्रास कायमचा टाळला जातो.

**कॉम्पॅक्टरचे प्रकार :** कामाचा वापर अथवा उपलब्ध मशिनरी यावरून कॉम्पक्टरची साधारण खालील

चार प्रकारात विभागणी करता येईल.

**१) हँड धुम्मस (रॅमर) :** साधारण १०–१५ किलो वजनाच्या लोखंडी चपट्या प्लेटला राउंड पाईप वेल्ड करून हा मॅन्युअल ऑपरेटेड धुम्मस बनवतात. तसेच लाकडी ओंडका आणि त्याला पकडण्यास दोन हॅण्डल अश्या प्रकारची रचनेचा धुम्मस छोट्या किरकोळ कामासाठी वापरता येऊ शकतो. अतिशय छोटे काम, अडचण असलेल्या ठिकाणी किंवा प्लंबिंग लाइन गेलेल्या ठिकाणी हा धुम्मस वापरतात. यात थोड्या प्रमाणात मुरूम दबाई शक्य होते.

**२) व्हायब्रेटिंग प्लेट कॉम्पॅक्टर :** शक्यतो बंगल्याची कामे, १०–२० ब्रास क्षेत्र असलेल्या प्लिंथ अथवा जमिनीची एका दिवसात दबाई करण्यास याचा उपयोग होतो. १५०–२५० किलो दरम्यान वजनाची बेस प्लेट, पेट्रोलवर चालणारे इंजिन आणि एक व्यक्ती व्यवस्थित हाताळू शकेल अशी याची रचना असते. मुरूम अथवा दाणेदार भर टाकलेल्या मटेरीअल साठी हे अधिक परिणामकारक ठरते.

**३) स्मुथ व्हीलड रोलर :** रोलर या नावाने हे प्रसिद्ध असून रोडची कामे तसेच मोठ्या स्वरूपाच्या औद्योगिक कामावर याचा जास्तीत जास्त वापर होतो. वाळू अथवा चिखल असलेल्या पृष्ठभागाची दबाई करण्यास स्मुथ व्हील रोलरचा वापर करतात. डिझेल वर चालणारे मशीन यामध्ये असून अवजड असल्याने एका कामावरून दुसऱ्या कामावर जाण्यास मर्यादित स्पीडमुळे ट्रकमधून वाहतूक करावी लागते. छोट्या इमारतीत याचा वापर करणे शक्य होत नाही परंतु मार्केटमध्ये छोट्या कामासाठी हॅण्ड रोलर उपलब्ध आहेत. क्रिकेट पिचवर वापरतात तसे रोलर काही ठिकाणी पृष्ठभाग दबाई आणि जमीन लेव्हल करण्यास वापरात येतात.

**४) शिप फुट रोलर :** यामध्ये चौकोनी बाहेर आलेल्या ठस्यातून जमीन चेपली जाते. स्मुथ व्हीलड रोलर सारखे हे मशीन असून यामध्ये प्रेशर, व्हायब्रेशन आणि रँमर इम्पॅक्ट अश्या एकत्रित बळामुळे चांगला परिणाम साधला जातो. यामुळे वेगाने आणि उपयुक्त अशी मुरूम लेव्हल होते. रोडची कामे तसेच मोठ्या स्वरूपाच्या औद्योगिक कामावर याचा जास्तीत जास्त वापर होतो.

**कॉम्पॅक्टरचा वापर केल्याचे फायदे :**

१) कॉम्पॅक्टरचा वापर केल्याने त्या मुरूम अथवा मातीच्या पृष्ठभागाची घनता वाढते.

२) मातीच्या कणामधील पोकळी कमी होते.

३) त्यातील सच्छिद्रपणा कमी झाल्याने कण एकमेकांना घट्ट चिकटून बसतात.

४) यामुळे बिल्डींग फौंडेशनचे कमी जास्त प्रमाणात खचण्याचे (असमान भूत्खनन) प्रमाण लक्षणीयरित्या कमी होते.

५) स्ट्रक्चरल क्रॅकचे प्रमाण अतिशय कमी होते.

६) भक्कम पायामुळे भविष्यात हा बेस फेल होण्याच्या शक्यता दुर्मिळ होतात.

७) कॉम्पक्टर अथवा धुम्मसमुळे सुट्टी माती अथवा मुरुमाची लोड बिअरिंग कॅपॅसिटी वाढते आणि आपणास भक्कम पाया मिळतो.

**कॉम्पॅक्टरचा वापर करण्याआधी बेस तयारी आणि योग्य परिणाम साधण्यास आवश्यक गोष्टी :**

प्लिंथमधील मुरूम भर अधिक परिणामकारक आणि दीर्घायुषी बांधकाम पाया होणाय्साठी पुढील गोष्टी करणे उचित ठरेल.

१) प्लिंथ मटेरीअल भर टाकण्यास नेहमी हार्ड मुरुमाचा वापर करावा त्यास आपल्या बोली भाषेत खडी मुरूम म्हणजेच छोटे दगड गोटे असलेला मुरूम असे संबोधितात. सॉफ्ट मुरूम असेल तर त्यास पाणी मारले आणि धुम्मस केल्यास त्याची माती होते. तसेच मोठे दगड वापरल्यास त्यामध्ये गॅप राहून त्या फटीमुळे पाया दबणे अथवा फटीमधून घूस लागणे आणि प्लिंथ पोखरली जाणे अश्या अडचणी येऊ शकतात. यामुळे भर करण्यासाठी खडी मुरूम वापरणे योग्य आहे.

२) ६ अथवा ९ जाडीचे भरीचे मटेरीअल अथवा मुरूम टाकल्यास आणि प्रत्येक थरास योग्य पाणी मारून कॉम्पक्टर अथवा धुम्मसने पृष्ठभाग लेव्हल केल्यास चांगला पृष्ठभाग तयार होतो.

३) आद्रता नियंत्रण : मुरुमाच्या थरास आवश्यकतेप्रमाणे पाणी मारल्यास योग्य आद्रता मिळू शकते जेणेकरून कॉम्पक्टरचा योग्य परिणाम साधून दोन मातीचे कण एकमेकांना घट्ट चिकटले जाऊन एकजीव पाया मिळण्यास मदत होते.

४) आवश्यक साधनांचा वापर : कॉम्पॅक्टरची गरजे प्रमाणे निवड करणे आवश्यक असून रहिवाशी इमारतीच्या प्लिंथ लेव्हल साठी व्हायब्रेटिंग प्लेट कॉम्पॅक्टरचा प्राधान्याने वापर केला जातो. तसेच अडगळ अथवा प्लंबिंग पाईप लाइन गेलेल्या ठिकाणी हॅण्ड धुम्मस (रॅमर) चा वापर केला जातो. औद्योगिक कामामध्ये आणि रोडच्या कामामध्ये प्राधान्याने स्मुथ व्हीलड रोलर किंवा शिप फुट रोलर यांचा वापर केला जातो.

**तात्पर्य :** इमारतीच्या कामामध्ये प्लिंथ लेव्हल साठी भक्कम पाया तयार करण्यास कॉम्पॅक्टर अथवा धुम्मसचा वापर आवश्यक आहे. भविष्यात येणाऱ्या खर्चिक रिपेअर गोष्टी टाळण्यासाठी कॉम्पॅक्टर अथवा धुम्मसचा वापर कधीही हितावर्य ठरेल.

कॉम्पॅक्टर अथवा धुम्मसचा योग्य प्रकारे वापर खूप महत्वाचा आहे परंतु याकडे बऱ्याच वेळेस दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे नंतर मेंटेनन्ससाठी लागणारा खर्च आणि मानसिक तसेच आर्थिक त्रास हा वेदानादायी असतो. या लेखाचे लेखक इंजि. प्रदिप तांदळे यांनी याविषयी उपयुक्त आणि गरजेची तांत्रिक माहिती या लेखातून दिली असून यामुळे दीर्घकाळ टिकणारे, प्लिंथ पाया पक्का झालेले आणि फ्लोअरींग न खचणारे स्ट्रक्चर आपणास बनवता येणे शक्य होते.

इंजि. प्रदिप तांदळे हे मागील पंचवीस वर्षापासून अहिल्यानगरमध्ये बांधकाम क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी आतापर्यंत बंगले, रो हाउस, इंडस्ट्रीयल, कमर्शिअल आणि रहिवासी अपार्टमेंट, मंगल कार्यालये, पेट्रोल पंप, हॉस्पिटल, शाळांच्या इमारतींची कामे, शो रूम अश्या विविध प्रकारची कामे तालुका आणि अहिल्या नगर जिल्ह्यात केली आहेत. कन्सल्टिंग कामात त्यांचा हातखंडा असून त्यांनी केलेल्या बुधवंत हॉस्पिटल इमारतीच्या कामास एसा बेस्ट स्ट्रक्चर पुरस्कार मिळाला आहे. बांधकाम क्षेत्रात काम करताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपताना संत गाडगे बाबा वसतिगृह, राष्ट्रीय पाठशाळा, अनामप्रेम, एसा भवन बांधकाम यांची बांधकामे केली असून एसा या संस्थेवरवर मागील पंधरा पेक्षा जास्त वर्षे संचालक, खजिनदार, सचिव, उपाध्यक्ष अश्या विविध पदावर काम केले आहे. सध्या ते एसा उपाध्यक्ष आणि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स संस्थेवर सहसचिव पदावर कार्यरत आहेत.

**लेखक :– इंजि. प्रदिप मधुकर तांदळे**
**(एसा उपाध्यक्ष)**



BE Civil , AMIE, AIV, CE, LLb, DLL
LW, DADR, PGDBM, MBS, MOV
**फर्म – श्रद्धा बिल्डकॉन**
**ऑफिस पत्ता – ऑफिस नं. २, पहिला मजला, सेक्टर नं. ४, एम आर ट्रेड सेंटर, वाडिया पार्क, माळीवाडा, अहिल्यानगर, मोबा. ८०८७७५२७४०.**
**मेल आय डी –** pradiptandale78@gmail.com

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या ‘आयबीएमआरडीला स्वायत्त दर्जा’ प्राप्त



नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रूरल डेव्हलपमेंट या प्रतिष्ठित संस्थेला युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनकडून १० वर्षांसाठी स्वायत्त दर्जा प्रदान करण्यात आला आहे. संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीतील हा अत्यंत महत्त्वाचा आणि अभिमानास्पद टप्पा मानला जात आहे.

प्राप्त झालेल्या या स्वायत्त दर्जामुळे संस्थेला अभ्यासक्रम रचना, अध्यापन पद्धती, परीक्षा व मूल्यमापन प्रणाली यामध्ये अधिक शैक्षणिक स्वातंत्र्य मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक, उद्योगाभिमुख आणि कौशल्यधारित शिक्षण देण्यास मोठी मदत होणार आहे.

आयबीएमआरडी ही अहिल्यानगर जिल्ह्यातील सलग दोनदा NAC मानांकन चक्रांमध्ये 'A' श्रेणी प्राप्त करणारी एकमेव व्यवस्थापन संस्था आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, कौशल्यविकास तसेच ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात संस्थेने सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत युजीसीने हा मानाचा दर्जा प्रदान केला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे महासचिव प्रभारी डॉ. पी. एम. गायकवाड, वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे तसेच संस्थेचे संचालक तांत्रिक सुनील कल्हापुरे यांनी आयबीएमआरडीचे संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांचे अभिनंदन करून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भविष्यात शिक्षण, संशोधन आणि उद्योगाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवण्याचा संस्थेचा निर्धार असल्याचे संचालक डॉ.संजय धर्माधिकारी यांनी सांगितले.

## बापूसाहेब गायकवाड यांचे युपीएससी परीक्षेमध्ये यश



नगर – कष्ट, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर चास (ता. अहिल्यानगर) येथील बापूसाहेब रतन गायकवाड यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ५६१ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी मिळवलेले हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांनी चास गाव व अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव मोठे केल्याचे बोलले जात आहे.

बापूसाहेब गायकवाड यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चास येथे पहिली ते चौथीपर्यंत झाले. त्यानंतर पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण श्री नृसिंह विद्यालय, चास येथे पूर्ण केले. पुढे अकरावी व बारावीचे शिक्षण अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या रेसिडेन्शियल कॉलेजमध्ये घेतले. तसेच गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, अहिल्यानगर येथून त्यांनी डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले.

सामान्य कुटुंबातून आलेल्या बापूसाहेब यांचे वडील ट्रक चालक म्हणून काम करतात. घरची आर्थिक परिस्थिती साधी असतानाही त्यांनी शिक्षणाची जिद्द कायम ठेवली. स्वतः वॉचमन म्हणून काम करत त्यांनी शिक्षणाचा प्रवास सुरू ठेवला. आधी आपल्या लहान भावाचे शिक्षण पूर्ण करून त्याला नोकरीला लावले आणि त्यानंतर वेळ मिळेल तसा अभ्यास करत पदवीचे शिक्षण पूर्ण केले.

## ‘युपीएससी’ परीक्षेत केडगाव येथील अभिषेक टेकाडेने मिळवली ६१० वी रँक



नगर – केडगाव येथील अभिषेक अशोक टेकाडे याने भारतीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत ६१० वी रँक मिळवत पाचव्या प्रयत्नात यश संपादन केले आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, संयम आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यामुळे हे यश मिळाल्याची भावना अभिषेकने व्यक्त केली आहे.

केडगावमधील पाच गोडाऊन परिसरात राहणाऱ्या अभिषेकचे माध्यमिक शिक्षण अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल व भाऊसाहेब फिरोदिया कनिष्ठ महाविद्यालय येथे झाले. त्यानंतर पुणे येथील वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगमधून त्याने मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली.

शालेय जीवनापासूनच त्याने 'यूपीएससी' परीक्षेचे ध्येय निश्चित केले होते. इंजिनिअरिंगची पदवी मिळाल्यानंतर त्याने नोकरी न करता सुरुवातीपासूनच स्पर्धा परीक्षांची पुस्तके वाचण्याची सवय त्याने लावून घेतली. विशेष म्हणजे अभिषेकने कोणत्याही क्लासचा आधार न घेता स्वतःच्या मेहनतीवर घरीच अभ्यास केला. दररोज किमान सहा ते सात तास अभ्यास, टेस्ट सिरीज सोडवणे, मुलाखतींचा सराव तसेच पेपर सोडवताना व मुलाखतीत होणाऱ्या त्रुटी सुधारण्यावर त्याने विशेष लक्ष दिले.

ऑनलाइन अभ्यासापेक्षा पुस्तक वाचनाला त्याने अधिक प्राधान्य दिले. स्मार्टफोनवरील सोशल मीडियापासून तो पूर्णपणे दूर राहिला. यापूर्वी त्याने 'यूपीएससी' ची परीक्षा चार वेळा मुख्य परीक्षेपर्यंत दिली होती. यंदा त्याला मुलाखतीची संधी मिळाली आणि त्या संधीचे सोने करत त्याने ६१० वी रँक मिळवत यश मिळवले.

अभिषेकचे वडील अशोक टेकाडे यांनी सांगितले की, मागील सहा वर्षांपासून अभिषेकने नातेवाईकांकडे जाणे, फिरणे यासारख्या गोष्टी टाळून स्वतःच्या आवडीनिवडींना मुरड घालत पूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले होते. त्याचा प्रवास निश्चितच कठीण होता; मात्र सातत्य आणि जिद्दीमुळे त्याने हे यश मिळवले. मुलाच्या यशाबद्दल बोलताना ते भावुक झाले.

# ग्रामीण पाणीपुरवठा बळकटीकरणासाठी ८ ते २२ मार्च दरम्यान ‘जल महोत्सव’

नगर – ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी तसेच सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी जिल्ह्यात ८ ते २२ मार्च या कालावधीत सर्व ग्रामपंचायतस्तरावर जल महोत्सव राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

भंडारी म्हणाले, नदी उत्सवाच्या धर्तीवर जल उत्सव राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या योजना, स्टँड पोस्ट नळपाणी पुरवठा योजना तसेच दरडोई किमान ४० लिटर प्रतिदिन पाणी न मिळालेल्या योजनांची क्षमता दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिनप्रमाणे वाढवण्यासाठी पुनर्जोडणी करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या, अनुदानित आश्रमशाळा आणि शासकीय वसतिगृहांना या योजनेतून नळजोडणी देण्यात येत आहे. तसेच एकाकी व आदिवासी वाडी–पाड्यांसाठी सौरऊर्जे–वर आधारित नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. जल महोत्सव जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत अशा तीन स्तरांवर आयोजित करण्यात येणार असून गाव व पंचायत समिती स्तरावर लोकजल उत्सव आयोजित केला जाणार आहे. हा उपक्रम पूर्णपणे लोकसहभागावर आधारित असेल. महिलांकडून फिल्ड टेस्टिंग किटच्या साहाय्याने पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी केली जाणार आहे. तसेच लोकप्रतिनिधी व नागरिक जलस्रोतांच्या संरक्षणासाठी पुढाकार घेणार असून जलस्रोतांचे पुनरुज्जीवन व स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. पाणीपुरवठा योजनांचे औपचारिक हस्तांतरण तसेच सामुदायिक शपथ घेण्याचे कार्यक्रमही आयोजित केले जाणार आहेत. ग्रामपंचायत विकास आराखड्यात पाण्याचा समावेश करण्यावरही भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पिण्याच्या पाण्याला सांस्कृतिक व सामाजिक प्राधान्य देणे, स्थानिक जलउत्सव संस्थात्मक करण्यासाठी प्रोत्साहन देणे, राज्य ते गावस्तरापर्यंत विविध विभागांमध्ये समन्वय साधणे, पाणी गुणवत्ता, सौर ऊर्जा तसेच देखभाल–दुरुस्तीसाठी दीर्घकालीन आराखडा तयार करणे, तसेच आरोग्य, पोषण आणि महिला सक्षमीकरणाला जलसेवेशी जोडणे हा जलमहोत्सवाचा प्रमुख उद्देश असल्याची माहिती ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता हितेंद्र चव्हाण यांनी दिली.











## हिंद सेवा मंडळाच्या उपाध्यक्षपदी विलास बडवे



नगर – हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या उपाध्यक्षपदी विलास बडवे यांची नियुक्ती करण्यात आली. मंडळाचेच माजी विद्यार्थी असलेले श्री. बडवे हे नगर अर्बन बँकेचे प्रशासकीय अधिकारी पदावरून चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. संस्कार भारती या अखिल भारतीय संघटनेच्या अहिल्यानगर समितीचे सचिव म्हणून त्यांनी पाच वर्षे दायित्व सांभाळले. ललित कलांच्या विविध स्पर्धांचे आयोजन तसेच संस्कार भारती अहिल्यानगर समितीचे शहर संघटना बरोबरच सांस्कृतिक कार्य विस्तारित करून ते मजबूत करण्यात त्यांचे महत्वाचे योगदान मानले जाते. विलास बडवे हे सध्या ग्रंथालय भारतीच्या पश्चिम प्रांतचे कार्यकारिणी सदस्य आहेत. तसेच श्री शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण संस्थेच्या कार्यवाहपदी ते कार्यरत आहेत. हिंद सेवा मंडळाच्याच भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनियर कॉलेज च्या शालेय समितीचे सदस्य म्हणून देखील ते काम पहात आहेत.




# शरीरांतर्गत समस्येमुळे पोटदुखी

काही लोकांना पोटात वारंवार वेदना जाणवतात. अनेकदा ते गॅस, थकवा किंवा चुकीचा आहार म्हणून त्याकडे दुर्लक्ष करतात, परंतु पोटदुखी वारंवार होत असेल तर ते शरीरातील अंतर्गत समस्येचे लक्षण असू शकते. छातीत जळजळ, जडपणा, उलट्या, भूक न लागणे, वारंवार अतिसार किंवा बद्धकोष्ठता, अशक्तपणा किंवा थकवा यासारखी इतर काही लक्षणे आहेत. त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त काही लोकांना वेदनांसह डोकेदुखी किंवा चक्कर येणेदेखील येऊ शकते.

वेदना बराच काळ कायम राहिली किंवा दररोजच्या कामांमध्ये समस्या निर्माण होऊ लागल्या तर त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. शरीर अशा लक्षणांद्वारे आपल्याला काहीतरी चुकीचे होत असल्याचा इशारा देते. पोटात वारंवार दुखणे, हे अनेक आजारांचे लक्षण असू शकते. हे इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (आयबीएस), इंफ्लेमेटरी बॉवेल डिसीज (आयबीडी), गॅस्ट्रोइसोफ ॅगल रिफ्लक्स डिसीज (जीईआरडी), सेलिॲक डिसीज, गॅस्ट्रोएन्टरिटिस, बॅक्टेरियातील संक्रमण,



पित्ताशयातील खडे, ॲपेंडिसाइटिस, स्वादुपिंडाचा दाह आणि मूत्रपिंडातील खडे यासारख्या परिस्थितीमुळे होऊ शकते. याव्यतिरिक्त, पेप्टिक अल्सर, तणाव, हर्निया किंवा लैक्टोज असहिष्णुतेसारखी ठरावीक अन्नाची ॲलर्जी यामुळेदेखील वेदना होऊ शकतात.

आरोग्य चर्चा

कधीकधी असामान्य आहार, चुकीची दिनचर्या किंवा दीर्घकाळापर्यंत दबाव आणि चिंता यामुळेदेखील ही वेदना वाढू शकते. सतत वेदना होत असल्यास वजन कमी होणे, अशक्तपणा किंवा इतर गंभीर लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. नेमके कारण जाणून घेण्यासाठी आणि वेळेवर उपचार सुरू करण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. पोटदुखी आणि संबंधित आजार टाळण्यासाठी दररोजच्या सवयी सुधारणे महत्वाचे आहे.

समतोल आणि वेळेवर जेवण करा, तळलेले आणि मसालेदार जेवण कमी खावे. पुरेसे पाणी प्या आणि दररोज चालण्यासारखा हलका व्यायाम करा. तणाव कमी करण्यासाठी योग आणि ध्यानाचा अवलंब करा. खाल्ल्यानंतर लगेच झोपणे. टाळा आणि रात्रीचे जेवण लवकर करा. स्वच्छतेची काळजी घ्या. लैक्टोज असहिष्णुतेसारख्या अन्न एलर्जी असल्यास ते लक्षात ठेवा. या सवयी पोटाच्या समस्या आणि वारंवार होणाऱ्या वेदना मोठ्या प्रमाणात टाळू शकतात. पोटदुखी कायम राहिली किंवा घरगुती उपचारांनी बरे होत नसेल तर त्वरित डॉक्टरांकडे जायला हवे.

तीव्र वेदना, उलट्या, अतिसारामुळे रक्त येणे, अचानक वजन कमी होणे किंवा सतत अशक्तपणा येणे ही गंभीर लक्षणे असू शकतात. लहान मुले, वृद्ध आणि गर्भवती महिलांच्या पोटदुखीकडे दुर्लक्ष करू नका. दीर्घकाळापर्यंत वेदना झाल्यास तपासणी करणे महत्त्वाचे आहे. यामुळे वेदनेचे नेमके कारण शोधून वेळेवर उपचार सुरू केले जाऊ शकतात.

ओटीपोटात वारंवार दुखणे हे अनेक आजारांचे लक्षण असू शकते. पचनसंस्थेशी संबंधित गॅस, आम्लपित्त, बद्धकोष्ठता, अल्सर किंवा इरिटेबल बाऊल सिंड्रोम (आयबीएस) यामुळे असा त्रास होऊ शकतो. महिलांमध्ये मासिक पाळीतील अडचणी, ओव्हेरियन सिस्ट, युटेरसशी संबंधित आजार किंवा मूत्रमार्ग संसर्गामुळेही ओटीपोटात दुखणे जाणवते. मूत्रपिंडातील खडे, ॲपेंडिसायटिस, आतड्यांचा संसर्ग किंवा जंतुसंसर्ग ही कारणेही असू शकतात

# झोपेत वारंवार व्यत्यय येतोय?



चांगल्या आरोग्यासाठी संपूर्ण झोप खूप गरजेची आहे. रात्रीची झोप वारंवार खंडित होत असेल तर ती सामान्य समस्या समजू नका. 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन संशोधनानुसार रात्री वारंवार झोपेच्या ब्रेकमुळे हृदयाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. ही समस्या दीर्घकाळ राहिली तर अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो.

आरोग्य वेध

या संशोधनानुसार, प्रत्येक व्यक्तीला रात्री किमान ७ ते ८ तास झोप घेणे आवश्यक आहे. 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार ज्या लोकांना सतत झोपेचा त्रास होतो त्यांना रक्तदाबाचा धोका असतो. झोपेच्या बिघाडामुळे शरीराला पूर्णपणे दुरुस्त होण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे हृदयाच्या कार्यावर परिणाम होतो. संशोधनात असेही दिसून आले आहे, की वारंवार झोपेचा ब्रेकडाउन मेंदूवरदेखील परिणाम करू शकतो. रात्री अनेक वेळा जाग आली तर याचा अर्थ असा होतो, की झोपेनंतरही मेंदू अधिक सक्रिय असतो. याचे प्रमुख कारण म्हणजे तुम्ही जास्त विचार करता किंवा कोणत्याही गोष्टीबद्दल मानसिक तणावाखाली असता. मानसिक तणाव असेल तर साहजिकच त्याचा परिणाम हृदयावरही होतो. कारण हृदयविकाराच्या झटक्याचे एक कारण मानसिक तणाव आहे.

रात्री गाढ झोपेच्या वेळी हृदय शिथिल होते आणि रक्तदाब सामान्य पातळीवर राहतो, परंतु वारंवार झोप खंडित होते तेव्हा हृदयावरील दाब वाढतो. यामुळे जळजळ होऊ शकते. त्यामुळे नंतर हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो. जे लोक दिवसातून २-३ वेळा झोपेच्या समस्येची तक्रार करतात त्यांना हृदयरोगाचा धोका ३० टक्क्यांनी वाढतो. रात्री झोप न लागणे किंवा निद्रानाशाचा त्रास ही आजच्या काळातील एक सामान्य पण गंभीर समस्या आहे. यामागे मानसिक, शारीरिक आणि जीवनशैलीशी संबंधित अनेक कारणे असतात. सततचा तणाव, चिंता, नैराश्य आणि कामाचा दबाव यामुळे मन शांत राहत नाही, परिणामी झोप लागत नाही. मेंदू सतत विचार करत राहिल्यामुळे शरीराला विश्रांती मिळत नाही. मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप यांसारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा झोपण्यापूर्वी जास्त वापर केल्यास त्यातून निघणारा निळा प्रकाश मेलाटोनिन या झोपेच्या हार्मोनच्या निर्मितीत अडथळा आणतो.

# चेहरा, मानेवर सूज आहे?

सकाळी आरशात पाहताना चेहरा किंवा मान नेहमीपेक्षा अधिक सुजलेली दिसत आहे का? अनेक लोक याला अपुरी झोप, जास्त मीठ खाणे किंवा थकवा म्हणून दुर्लक्ष करतात, पण शरीर असे संकेत विनाकारण देत नाही. कधी कधी ही सूज आतून सुरू झालेल्या किडनीच्या समस्येचा पहिला इशारा असू शकते.

किडनी नीट काम करत नसेल, तर त्याचा परिणाम सर्वात आधी चेहरा, मान आणि त्वचेवर दिसू लागतो. वेळेत हे संकेत ओळखले, तर गंभीर आजार टाळणे शक्य आहे. म्हणूनच या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्यामागचे खरे कारण समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. किडनी योग्यरीत्या अतिरिक्त पाणी बाहेर टाकू शकत नसतील तर शरीरात द्रव साचतो. याचा परिणाम म्हणून सकाळी उठल्यावर



डोळ्यांभोवती, गालांवर किंवा मानेवर सूज दिसू शकते. ही सूज वारंवार जाणवत असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

किडनीने नीट कार्य न केल्यास शरीरात घातक घटक साचू लागतात. त्यामुळे चेहरा व मान येथील त्वचा कोरडी, खरबरीत, करड्या रंगाची किंवा निस्तेज दिसू शकते. हा बदल सौंदर्यापुरता नसून आतल्या आरोग्याचा संकेत असू शकतो. घटकद्रव्ये आणि खनिजांचे संतुलन बिघडल्यास त्वचेवर खाज, जळजळ किंवा लाल पुरळ येऊ शकतात. ही लक्षणे बहुतेक वेळा चेहरा आणि मानेवर अधिक जाणवतात.

जाणून घ्या

किडनी कमजोर झाल्यास शरीरात द्रव साचतो आणि रक्तवाहिन्यांवरील दाब वाढतो. यामुळे मानेच्या बाजूला असलेल्या शिरा फुगलेल्या किंवा ठळक दिसू शकतात. हे हृदय आणि किडनी दोन्हीसाठी गंभीर इशारा ठरू शकते.

पाठीच्या खालच्या भागात किंवा पोटात वेदना, पाय सुजणे, हात-पाय बधीर होणे, स्नायूंमध्ये गोळे येणे हीही किडनी आजाराची लक्षणे असू शकतात. वारंवार लघवी होणे, रात्री झोपेतून उठून लघवीला जावे लागणे, लघवी फेसाळ, गडद रंगाची किंवा रक्तमिश्रित दिसणे, लघवीचा प्रवाह कमी होणे-ही सर्व किडनीच्या सुरुवातीच्या समस्यांची चिन्हे आहेत.

# डोकेदुखीचा नवा प्रकार

ऑफिसमधील ताण, अनियमित दिनचर्या आणि घाईघाईने जेवण यांच्यामध्ये डोकेदुखी सामान्य वाटते; पण प्रत्येक डोकेदुखी ताणामुळे होत नाही. कधीकधी, मूळ कारण पोटात असते. याला सामान्यतः गॅस डोकेदुखी किंवा पोटाची डोकेदुखी असे म्हणतात.

पोटामुळे होणारी डोकेदुखी ही सामान्य तणाव किंवा सायनस डोकेदुखी नसते. पचनसंस्थेमध्ये अपचन, आम्लता किंवा गॅस यासारख्या समस्या असतात तेव्हा ती होते. पोट आणि मेंदू यांच्यात घनिष्ट संबंध असतो. पोटात असंतुलन असते



तेव्हा शरीर प्रतिक्रिया देते आणि बऱ्याच लोकांसाठी ही वेदना डोक्यात पसरते. मसालेदार अन्न, अनियमित जेवण, जास्त चहा आणि कॉफी आणि सततचा ताण ही समस्या वाढवू शकतो.

सामान्य गॅस्ट्रिक डोकेदुखी आणि गॅस्ट्रिक मायग्रेनमधील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. पोटातील डोकेदुखी सौम्य किंवा सततची असू शकते, तर पोटातील मायग्रेनमुळे अधिक तीव्र, धडधडणाऱ्या वेदना होतात. त्यांच्यासोबत हलका आणि आवाजाचा त्रास, मळमळ किंवा उलट्यादेखील असू शकतात. दोन्ही प्रकरणांमध्ये, मूळ कारण पचन समस्या आहे.

आरोग्य मंत्र

ही समस्या अधूनमधून उद्भवली तर ती चिंतेचे कारण नाही, परंतु ती वारंवार होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. सतत पोटामुळे होणारी डोकेदुखी ही जुनाट जठराची सूज, पेप्टिक अल्सर, पित्ताशयाचा आजार, चिडचिडे आतड्यांसंबंधी सिंड्रोम किंवा गॅस्ट्रोएसोफ ॅजियल रिफ्लक्स रोग यासारख्या गंभीर आजारांचे लक्षण असू शकते.

आठवड्यातून दोनदापेक्षा जास्त वेळा डोकेदुखी होत असेल, वजन कमी होत असेल, सतत उलट्या होत असतील, तीव्र पोटदुखी असेल किंवा घरगुती उपचारांनी आराम मिळत नसेल तर गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्टचा सल्ला घ्या. आवश्यक असल्यास एंडोस्कोपीसारख्या चाचण्या पचनसंस्थेची स्थिती स्पष्ट करू शकतात. उपचारांचा पाया केवळ वेदनाशामक औषधांवर नाही तर पचन सुधारणे हा आहे. नियमित जेवण, हलका आणि संतुलित आहार, पुरेसे पाणी आणि नैराश्यावर नियंत्रण ठेवणे हे लक्षणीय आराम देऊ शकते. वारंवार येणारी समस्या असेल आणि त्यावर तातडीने उपाय केले नाहीत तर भविष्यात मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात.

# रागावर नियंत्रण ठेवा

हार्ट अटॅक येण्यामागे अनेक कारणे असतात, पण वारंवार राग येणेसुद्धा हार्ट अटॅकचे कारण ठरू शकते. अमेरिकेतील प्रतिष्ठित जॉन्स हॅपकिन्स विद्यापीठाच्या संशोधनात ही बाब पुढे आली आहे. अचानक राग आल्यावर



पुढील दोन तासांमध्ये हार्ट अटॅकचा धोका सुमारे ५ पट वाढू शकतो, असे या संशोधनात सांगण्यात आले आहे.

२०१४ मध्ये 'युरोपीयन हार्ट जनरल' मध्ये प्रकाशित या रिसर्चनुसार, राग जितका जास्त आणि जितक्या वारंवार येतो तितका तो हृदयासाठी अधिक घातक शकतो. या संशोधनानुसार, वारंवार राग येणाऱ्या पुरुषांना आधी कोणताही हृदयविकार नसतानाही हार्ट अटॅक येऊ शकतो. रागाच्या वेळी शरीरात कॅटेकोलामाइन्स नावाचे स्ट्रेस हार्मोन झपाट्याने वाढतात. या हार्मोनमुळे अचानक रक्तदाब वाढतो. त्यामुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो, असे या अहवालात सांगण्यात आले आहे.


अचानक राग आल्यावर स्ट्रेस हार्मोन वाढल्यामुळे ब्रोकन हार्ट सिंड्रोम होऊ शकतो. त्यामुळे अटॅक येण्याची शक्यता असते. हा धोका पुरुषांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येते. 'जॉन्स हॉपकिन्स मेडिसीन' च्या संशोधनात १,३०० हून अधिक पुरुषांवर यासंदर्भात संशोधन करण्यात आले. वारंवार राग येणाऱ्यांमध्ये हार्ट डिसीज आणि अटॅकचे प्रमाण जास्त आढळून आले.

हे टाळा

राग कमी किंवा न येणाऱ्यांमध्ये अटॅकचा धोका कमी होता, असेही या संशोधनातून दिसून आले. जास्त राग येणाऱ्यांमध्ये आधीची आजारपणाची कोणतीही गंभीर लक्षणे नसतानाही हार्ट अटॅकचा धोका पाचपट जास्त दिसून आला. या अभ्यासातून स्पष्ट झाले, की हाय कोलेस्ट्रॉल किंवा हृदयविकाराच्या इतिहासाइतकाच राग हादेखील हार्ट अटॅकचा मोठा रिस्क फॅक्टर आहे. त्यामुळे वारंवार राग येणाऱ्यांनी तो नियंत्रित करणे आवश्यक आहे.

नवसंशोधन

## यांच्या एकत्रीकरणामुळे...




'ड' जीवनसत्त्व आणि कॅल्शियम हे दोन्ही घटक शरीरासाठी आवश्यक असतात. या दोन्ही घटकांमुळे हाडांना बळकटी मिळते. या दोन घटकांची कमतरता दूर करण्यासाठी पूरक औषधं दिली जातात. मात्र 'ड' जीवनसत्व आणि कॅल्शियमयुक्त औषधं (सप्लिमेंट्स) एकाच वेळी घेणं धोक्याचं ठरू शकतं, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. याबाबतचं संशोधन नुकतंच प्रसिद्ध करण्यात आलं. या औषधांच्या एकत्रीकरणामुळे हृदयाचा पक्षाघात (हार्ट स्ट्रोक) होण्याचा धोका असल्याचं तज्ज्ञ सांगतात. विविध प्रकारच्या १६ सप्लिमेंट्सचा तसंच आहारातल्या बदलांचा हृदयाच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत यावेळी संशोधन करण्यात आलं. कॅल्शियम आणि 'ड' जीवनसत्त्वाच्या सप्लिमेंट्स एकत्रित घेतल्याने पक्षाघाताचा धोका १७ टक्क्यांनी वाढत असल्याची बाब यातून समोर आली आहे.

दंतारोग्य

## तोंडाला दुर्गंधी येतेय?



तोंडाला येणारी दुर्गंधी नकोशी वाटते. दातांमध्ये अडकून बसलेले अन्नकण सडल्यामुळे मोठ्या प्रमाणावर बॅक्टेरियांची निर्मिती होते आणि तोंडाला दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी कमी करण्यासाठी अनेक जण माउथ वॉशचा वापर करतात. पण बरेचदा माउथ वॉशही परिणामकारक ठरत नाही. तोंडाची दुर्गंधी घालवण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे. पाण्यामुळे तोंडातला ओलावा टिकून राहिल्याने बॅक्टेरियाचं प्रमाण कमी होतं, असं तज्ज्ञ सांगतात. तोंडांची दुर्गंधी टाळण्यासाठी नियमित चूळ भरायला हवी. झोपण्याआधी चहा-कॉफीचं सेवन टाळावं. तसंच जीभ नीट स्वच्छ करावी. दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकणं गरजेचं आहे. रात्री दात घासल्यामुळे मुखदुर्गंधी कमी व्हायला मदत होते.

डोळ्यांचं आरोग्य

## डोळ्यांकडे दुर्लक्ष नको



मधुमेहाची बरीच लक्षणं पटकन लक्षात येत नाहीत. काही वेळा आपण या लक्षणांकडे दुर्लक्ष करतो. मात्र आपले डोळे बरीच गुपितं उलगडत असतात. मधुमेहाचं निदानही डोळ्यांच्या माध्यमातून होऊ शकतं. मधुमेहामुळे शरीरातल्या रक्तवाहिन्या प्रभावित होतात. याचे दृश्य परिणाम डोळ्यात दिसू लागतात. मधुमेहामुळे बऱ्याच गुंतागुंती निर्माण होतात. त्यापैकी एक म्हणजे डायबेटिक रेटिनॉपॅथी. यामुळे कायमस्वरुपी अंधत्व येऊ शकतं. रक्तातल्या साखरेच्या प्रमाणामुळे डोळ्यांमधल्या रेटिनावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे अंधुक दिसणं हे सुद्धा मधुमेहाचं महत्त्वाचं लक्षण असतं. म्हणूनच अचानक अंधुक दिसू लागलं तर डोळ्यांसोबतच रक्ताचीही तपासणी करा.

आजीबाईचा बटवा

## गुणकारी दालचिनी

दालचिनी हा अत्यंत गुणकारी असा मसाल्याचा पदार्थ आहे. यातल्या अँटीऑक्सिडंट्समुळे फ्री रॅडिकल्सचे दुष्परिणाम कमी होतात. यात दाह कमी करणारे गुणधर्म असतात. याशिवाय यातले अनेक घटक बॅक्टेरियाविरोधी म्हणून काम करतात. तर अशी ही दालचिनी पदार्थाची चव तर वाढवतेच शिवाय विविध रोगांवरही प्रभावी ठरते. 'पॉलिसिस्टिक ओव्हरियन सिंड्रोम' हा विकार सध्या महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर



आढळतो. दालचिनीच्या सेवनाने या विकाराला आळा घालता येतो.

दालचिनीमुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहातं. त्यामुळे दालचिनी हे मधुमेहींसाठी वरदान समजलं जातं. दालचिनीच्या सेवनामुळे विविध प्रकारचे जंतूसंसर्ग टाळता येतात. वजन कमी करणाऱ्यांसाठीही दालचिनी उपयुक्त ठरू शकते. म्हणूनच आहारात दालचिनीचा समावेश करायला हवा.

# महिला दिनानिमित्त महाराष्ट्रात दारूबंदी करावी

## अवैध मद्यविक्रीविरोधात धडक मोहीम : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाऊसाहेब बारहाते यांची निवेदनाद्वारे मागणी

नगर – समाजातील वाढत्या व्यसनाधिनतेमुळे कुटुंबांमध्ये आर्थिक, मानसिक व सामाजिक तणाव वाढत असून त्याचा सर्वाधिक फटका महिलांना व मुलांच्या भवितव्याला बसत आहे. या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड तथा गुरुदेव सेवक भाऊसाहेब सावळाराम बऱ्हाटे यांनी महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रात दारूबंदी लागू करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मेल करून निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

बऱ्हाटे म्हणाले की, कुटुंबातील कर्ता पुरुष व्यसनाधीन झाल्यास त्या कुटुंबावर आर्थिक व मानसिक तणाव निर्माण होतो. त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि संस्कारांवर होऊन अनेक कुटुंबांचे शांततामय जीवन विस्कळीत होत असल्याचे वास्तव समाजात दिसून येत आहे.



शासनाने गावोगावी पोलीस पाटील, सरपंच तसेच विविध अधिकारी नियुक्त केले असले तरी व्यसनाधिनतेमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रात दारूबंदी लागू करावी तसेच ज्यांच्याकडे दारू पिण्याचा परवाना आहे त्यांनाच मर्यादित प्रमाणात दारू विकावी. त्यासाठी आधार कार्ड पडताळणी अनिवार्य करावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच दारू विक्री केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ग्रामरक्षक दल व पोलीस पाटील यांनी नियमित निरीक्षण करावे. गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध मद्यविक्रीकडे काही ठिकाणी दुर्लक्ष होत असल्याची तक्रार अनेक माता–भगिनींकडून होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महिला दिनाच्या निमित्ताने पुढील एका महिन्यात अवैध मद्यविक्रीवर शंभर टक्के नियंत्रण आणावे, अन्यथा गावातील अन्यायग्रस्त महिला, महिला बचत गट व महिला ग्रामरक्षक दल यांच्या माध्यमातून पोलिसांच्या ११२ हेल्पलाईनवर माहिती देण्याची धडक मोहीम सुरू करण्यात येणार असल्याचे बऱ्हाटे यांनी जाहीर केले.

महिलांच्या सन्मानासाठी व्यसनमुक्त समाज उभारणे हीच महिला दिनाची खरी भावना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## फ्लेक्सिकॅप म्युच्युअल फंडाचे काम पोर्टफोलिओच्या क्रिकेट टीमसारखे

क्रिकेटमध्ये कोणताही एक खेळाडू प्रत्येक फॉर्मॅटसाठी परिपूर्ण नसतो. कसोटी सामन्यामध्ये संयम आणि तंत्राची आवश्यकता असते, तर टी- २० सामन्यामध्ये आक्रमकता आणि जलद धावा आवश्यक असतात. एखादा चतुर निवडकर्ता योग्य संयोग साधून निवड करून संघ तयार करतो, केवळ एकाच प्रकारच्या खेळाडूंनी संघ भरला जात नाही. म्युच्युअल फंडांद्वारे फ्लेक्सिकॅप गुंतवणुकीचे कार्यसुद्धा अशाच प्रकारे चालते.



प्रीतम प्रकाश गुगळे

**गुंतवणुकीचे स्वातंत्र्य**

फ्लेक्सिकॅप म्युच्युअल फंड हा बाजाराच्या एखाद्या निश्चित साच्यात बंदिस्त नसतो. बाजारातील ट्रेंड आणि मूल्यांकनांचा अंदाज घेऊन परिस्थितीनुसार वेगवेगळ्या बाजार भांडवलाच्या स्टॉकमध्ये बदल करण्याचे स्वातंत्र्य त्याच्या व्यवस्थापकाला असते.

**फ्लेक्सिकॅप फंडमध्ये गुंतवणूक का?**

गुंतवणूकदारांच्या दृष्टीने हा तर्क सोपा असतो : एकाच फंडाच्या माध्यमातून आपल्याला बाजारपेठेच्या अनेक विभागांमध्ये गुंतवणूक करता येते. त्या अंतर्भूत वैविध्यामुळे जोखीम कमी होण्यास आणि अतिरेकी अवलंबित्व कमी होण्यास मदत होऊ शकते. बाजारपेठ जेव्हा अनिश्चित असते, तेव्हा फंड मजबूत आणि मोठ्या कंपन्यांकडे झुकू शकतो. अर्थव्यवस्था जेव्हा तेजीत असते, तेव्हा जलद वाढीचा फायदा घेऊ शकणाऱ्या मध्यम आणि लघु व्यवसायांना अधिक गुंतवणूकीची आवश्यकता असू शकते.

या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेला फंड शोधणाऱ्या गुंतवणूकदारांच्या दृष्टीने हे धोरण प्रत्यक्षात कसे कार्य करते हे आयसीआयसीआय प्रुडेन्शियल फ्लेक्सिकॅप फंड दाखवून देतो. याच्या लवचिक वितरणामुळे विविध बाजार भांडवलांमध्ये वितरण केल्याने वैविध्य कायम ठेवत सर्व चक्रांमध्ये संधी मिळवण्याचे उद्दिष्ट साधण्यात येते. या फंडाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत एका वर्षात ९.९१ टक्के चक्रवाढ वार्षिक वृद्धिदर, तीन वर्षांत १८.९३ टक्के सीएजीआर आणि स्थापनेपासून (जुलै २०२१) १५.१९ टक्के सीएजीआर मिळवून दिला आहे.

अशा प्रकारे, प्रत्येक चांगला क्रिकेट कर्णधार जे करतो तेच करण्याचे उद्दिष्ट फ्लेक्सिकॅप म्युच्युअल फंड बाळगतो, ते म्हणजे खेळपट्टी, परिस्थिती आणि खेळाच्या परिस्थितीशी जुळवून घेणे.

# कत्तलीसाठी चालविलेल्या जनावरांचा टेम्पो पकडला

## दोन जनावरांची सुटका; एकास पकडले, दुसरा फरार



नगर – जनावरांना निर्दयीपणे वाहनात कोंबून कत्तलीसाठी वाहतूक केली जात असताना नगर तालुका पोलिसांनी वाळुंज गावाच्या शिवारात कारवाई करीत वाहनासह दोन जनावरे जप्त केली. ही कारवाई ७ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आली. या कारवाईत एक आरोपी ताब्यात घेतला असून, दुसरा आरोपी फरार आहे.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यातील कॉन्स्टेबल विक्रांत विलास भालसिंग यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, ७ मार्च रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून माहिती मिळाली की, अहिल्यानगर–सोलापूर रोडवरून वाळुंज गावाच्या शिवारातून कत्तलीसाठी जनावरे भरून एक वाहन जात आहे. या माहितीच्या आधारे सहाय्यक फौजदार शकिल सय्यद, चालक पोलीस कॉन्स्टेबल शिंदे व फिर्यादी भालसिंग हे घटनास्थळी रवाना झाले. पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास वाळुंज शिवारात अहिल्यानगर–सोलापूर रोडवर वाहन (क्र. एमएच–१६, सीडी–४४८१) आढळून आले. या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये एक काळ्या–पांढऱ्या रंगाची जर्सी जातीची गाय व एक राखाडी रंगाचा बैल दाटीवाटीने दोरांनी बांधून ठेवलेले दिसून आले. वाहन चालकास विचारणा केली असता त्याने आपले नाव योगेश बाबासाहेब ताकपेरे (वय ३२, रा. हिंगणगाव, ता. जि. अहिल्यानगर) असे सांगितले. पुढील चौकशीत ही जनावरे मुदस्सर कदिर कुरेशी (रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर) यांच्या सांगण्यावरून कत्तलीसाठी नेत असल्याचे त्याने कबूल केले. यामध्ये अंदाजे १० हजार रुपये किंमतीची जर्सी गाय, २० हजार रुपये किंमतीचा बैल आणि अंदाजे ३ लाख रुपये किंमतीचे वाहन असा सुमारे ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक योगेश बाबासाहेब ताकपेरे याला ताब्यात घेण्यात आले असून मुदस्सर कदिर कुरेशी हा फरार आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# कर्करोगापासून संरक्षण मिळविण्यासाठी एचपीव्ही लसीकरण आवश्यक

## अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे

नगर – एचपीव्ही लसीकरण ही मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मोहिम आहे. गर्भाशयाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळविण्यासाठी या लसीकरण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात ९ मार्चपासून राबविण्यात येणाऱ्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. पात्र मुलींना लसीकरणाबाबत अचूक माहिती देऊन मोहिमेत अधिकाधिक सहभागासाठी मोहिमेची व्यापक स्वरुपात जागृती करण्याचे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात एचपीव्ही लसीकरण मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा कार्यबल गट समितीच्या बैठकीत अपर जिल्हाधिकारी हिंगे बोलत होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात एचपीव्ही लसीकरण मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा कार्यबल गट समितीच्या बैठकीत अपर जिल्हाधिकारी हिंगे बोलत होते. बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. संदीप पुंड, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. राजुरकर, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर आदी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे म्हणाले, आरोग्य विभागाने शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, समाजकल्याण तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून या मोहिमेचे काटेकोर नियोजन करावे. शाळांमधील पात्र मुलींची अचूक नोंदणी करून त्यांचे लसीकरण वेळेत पूर्ण करावे. पालकांमध्ये लसीकरणाबाबत कोणताही गैरसमज राहू नये यासाठी व्यापक जनजागृती करावी. अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून तसेच ग्रामसभेद्वारे गावागावात माहिती पोहोचवावी. लसीकरणाच्या दिवशी आवश्यक मनुष्यबळ, औषधसाठा आणि थंड साखळी (कोल्ड चेन) व्यवस्थापन व्यवस्थित ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे म्हणाले, १४ वर्षे पूर्ण केलेल्या व १५ वर्षे पूर्ण न केलेल्या मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे १ टक्का लाभार्थी अपेक्षित असून त्यांना गार्डासिल–४ या लसीचा एकच डोस देण्यात येईल. ही लस ०.५ मिली इतकी डाव्या दंडाच्या वरच्या भागात स्नायूमध्ये दिली जाईल. लसीकरण सत्र सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत चालेल व सर्व पात्र लाभार्थ्यांची तसेच दिलेल्या लसीची नोंद यू–विन पोर्टलवर केली जाणार आहे. लसीकरणापूर्वी लाभार्थी उपाशी पोटी नसेल याची पालकांनी खात्री करावी. लस देण्याआधी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून लाभार्थीची तपासणी केली जाईल. प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी योग्य व्यवस्थापन करण्यात आले असून लस घेतल्यानंतर लाभार्थीला तीस मिनिटे लसीकरण सत्राच्या ठिकाणी थांबवले जाईल. तरी समाजमाध्यमद्वारे पसरविण्यात येणाऱ्या अफवांवर लोकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# कर्जत आणि जामखेड तालुक्यातील ४ धार्मिक स्थळांना ‘ब’ वर्गाचा दर्जा

नगर – शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील चार धार्मिक स्थळांना ‘ब’ वर्गाचा दर्जा देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे या ठिकाणांच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागाने ५ मार्च रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार कर्जत तालुक्यातील श्री खंडोबा देवस्थान, शेगुड, श्री लालगिर बुवा मठ ट्रस्ट, मांदळी, तसेच श्री क्षेत्र जगदंबा मंदिर देवस्थान, कुलधरण आणि जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थान, जवळा या यात्रास्थळांना ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत ‘ब’वर्गाचा दर्जा देण्यात आला आहे.

या दर्जामुळे संबंधित यात्रास्थळांच्या परिसरात मूलभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुशोभीकरण यासह इतर विकासकामांसाठी निधी उपलब्ध होणार असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत.

प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या धार्मिक स्थळांच्या विकासासाठी शासनस्तरावर महत्त्वाचा निर्णय झाला असून स्थानिक नागरिक व भाविकांमध्ये या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

## मिज्नबा शेख हिचा रमजानचा पहिला रोजा

नगर – सावित्रीबाई फुले उर्दु प्राथमिक कन्या शाळेतील पहिल्या इयत्तेत शिकणाऱ्या कु. मिज्नबा मतीन शेख, वय ५ वर्ष हिने रम जान महिन्याचा पहिला उपवास पुर्ण केला. अ. नगरचे ज्येष्ठ फिलॅटीलीस्ट (दुमिळ पोस्टाचे तिकीटे, फर्स्ट डे कव्हर व मिनिचरचे संग्राहक) अलहाज एस.ए.लतीफ यांची मिज्नबा शेख ही नात आहे.



एवढ्या कमी वयात कडक उन्हात रोजा पुर्ण केल्याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक अरुणराव धर्माधिकारी, हिंद सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. मधुसुदन मुळे, गड किल्ल्यांचे अभ्यासक ठाकुरदास परदेशी, दुर्मिळ वस्तुंचे संग्राहक पंकज मेहेर व समाजाच्यावतीने तिचे कौतुक करण्यात येऊन तिचे अभिनंदन करण्यात आले.

# दिल्लीगेट येथे छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानचा शिवजयंती सोहळा न भूतो असा भव्यदिव्य : भानुदास कोतकर

नगर – दिल्लीगेट येथे छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने साजरा झालेला हा शिवजयंतीचा सोहळा न भूतो असा भव्यदिव्य झाला आहे. यासाठी छिंदम बंधूंचे अभिनंदन करतो, असे सांगून बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर यांनी शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथी नुसार साजरी होणाऱ्या शिवजयंती निमित्त दिल्लीगेट येथे झालेला शिवजन्मोत्सव सोहळा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली. छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने झालेल्या या वैशिष्ट्यपूर्ण सोहळ्यास बाल शिवाजीचा पाळणा गीत नृत्य, महिलांचा लेझीम डाव, लाठीकाठी व तलवार दांडपट्टा या मर्दानी खेळांचे व मल्लखांबचे चित्तथरारक प्रत्यक्षिके तसेच मार्कंडेय शाळेच्या विद्यार्थ्यांचे ढोल पथक व लेझीमचा डाव अशा नानाविध कार्यक्रमांनी हा शिवजन्मोत्सव सोहळा रंगला.



छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने झालेल्या शिवजन्मोत्सव सोहळ्यात महाराजांची आरती करताना बजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर. समवेत संयोजक श्रीपाद छिंदम, श्रीकांत छिंदम. यावेळी सादर झालेल्या बाल शिवाजीचे पाळणा गीत नृत्य, लेझीम डाव व मर्दानी खेळांनी शिवजन्माचा सोहळा रंगला.

कार्यक्रमाच्या मध्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास भानुदास कोतकर यांच्या हस्ते अभिवादन करून आरती करण्यात आली. यावेळी सुनील रामदासी, ज्येष्ठ विधीज्ञ अच्युतराव पिंगळे, राजेंद्र चोपडा यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक नगरसेवक श्रीपाद छिंदम, माजी नगरसेवक श्रीकांत छिंदम, संजय वल्लाकटी, महेश सब्बन व प्रतिष्ठानचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

अच्युतराव पिंगळे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानने उत्कृष्टपणे शिवजयंती साजरी केले आहे. हजारो नागरिकांचा लाभलेला प्रतिसाद हा कौतुकास्पद आहे. असा भव्य सोहळा छिंदम बंधूंनी दरवर्षी साजरा करावा.

प्रास्ताविक नगरसेवक श्रीकांत छिंदम यांनी केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानचे अमोल बोल्ली, शहीद शेख, रोहन येनगुंदुल, उमेश मेरगू, सागर लोढा, अमृत वन्नम, अक्षय माथेसुळ, संजय आकुबत्तीन, हेमंत गायकवाड, राजू म्याना, राजू जामदारे, विनायक गुडेवार, विजय सामलेटी, नरेंद्र गुरुड, जयंत कारामपुरे, किशोर हरबा, स्वप्निल दिवाने, रोहन येनगुंदुल व सागर बल्लाळ आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०७/०३/२०२६

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे चाहुराणा बु.** येथील **टि.पी. स्कीम नं. ३** मधील खालील वर्णनाची मिळकत–

| टि.पी. स्कीम नं. | फायनल प्लॉट नं. | सब प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| ३ | १०० | ७ | २७८.८० चौ.मी. |

**(याचा जुना सर्व्हे नंबर ४५/१+१३०/१)**

ही संपूर्ण जागा व त्यावरील आर.सी.सी.मधील असलेले संपूर्ण बांधकाम तसेच लाईटमीटर व नळ कनेक्शनसह आहे त्या स्थितीत ही संपूर्ण मिळकत.

**याची चतुःसीमा**

पूर्वेस : सब प्लॉट नंबर १७ — दक्षिणेस : सब प्लॉट नंबर ८

पश्चिमस : रस्ता — उत्तरेस : सब प्लॉट नंबर ६

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**

**१. सौ. गीता विनायक शिरहट्टी, २. सौ. गौतमी विनायक शिरहट्टी, ३. श्री. कौशिक विनायक शिरहट्टी,**
सर्व रा. स्टेशन रोड, आनंदऋषी हॉस्पीटल, जवळ, माणिकनगर, अहिल्यानगर.

**ॲड. अंकिता अनिल शर्मा (पगारिया), ॲड. गणेश एम. शर्मा**
फोन नं. २२४११०६.मो. ९४२२२२०८४५, ऑफीस नं.१४,१७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स दाळमंडई, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

प्रति. **श्रीम.शगुफ्ता अयुब खान (शगुफ्ता नसीम मजहर खान**
रा.लाईन बाजार, कोठला रोड, ता.जि.अहिल्यानगर : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्रीम.शगुफ्ता अयुब खान (शगुफ्ता नसीम मजहर खान) यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्रीम. शगुफ्ता अयुब खान (शगुफ्ता नसीम मजहर खान) यांचा दि.१२/०६/१९७९ रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, श्रीम. शगुफ्ता अयुब खान (शगुफ्ता नसीम मजहर खान) यांचा दि.१२/०६/१९७९ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे श्रीम. शगुफ्ता अयुब खान (शगुफ्ता नसीम मजहर खान) यांचा दि. १२/०६/१९७९ रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २८/०२/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस (कागदपत्रे हरविल्याबाबत)

तमाम लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली सर्व जागा व त्यावरील बांधकाम हे अहमदनगर सिनेएक्सीबीअर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीची असून तरी सदर जागेची मूळ कागदपत्रे आमचे पक्षकार यांच्या ताब्यातून हरविली आहेत. याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

**जागेचा तपशील**

१) पालिकेचे नाव : अहिल्यानगर म.न.पा. इतर वर्णन, इतर माहिती : महानगरपालिका हद्दीतील शहर नगर येथील सि स नंबर ५२८९ अ याचे क्षेत्र १००२.५२ चौ मी सि स नंबर ५३०६/१३ याचे क्षेत्र ११३.७१ चौमी सि स नंबर ५२९५ याचे क्षेत्र ८३.६२ चौ मी सि स नंबर ५३०६/१४ याचे क्षेत्र १११.२० चौ मी सिस नंबर ५२९३ याचे क्षेत्र ७९.४४ चौ मी व म्यूनिसिपल लेन क्षेत्र ४१.८१ चौ मी सि स नंबर ७४७९ याचे क्षेत्र ३२.१० चौ मी सि स नंबर ७०८० याचे क्षेत्र ४.२० चौ मी सिस नंबर ७००७ याचे क्षेत्र ५.८० चौ मी सि स नंबर ७०६९ याचे क्षेत्र ४.२० चौ मी सि स नंबर ७४८२ याचे क्षेत्र २६.५० चौ मी सि स नंबर ७४८० याचे क्षेत्र २.५० चौ मी सि स नंबर ७४८१ याचे क्षेत्र ३४.०० चौ मी असे एकुण क्षेत्र १५४१.६० चौ मी व त्यावरील थिएटरचे बांधकामासह संपुर्ण मिळकत तारणगहाण दिली असे (C.T.S. Number : 5289, 5306/13, 5295, 5306/14, 5293, म्युनिसिपल लेन, 7479, 7080, 7007, 7069, 7482, 7480, 7481) गहाळ झालेल्या दस्तऐवजाचा क्र., दस्तऐवजाचा प्रकार, दिनांक नोंदणी क्रमांक व संबंधित कार्यालय खालील प्रमाणे आहे.

| अनु. क्र. | दस्तऐवजाचा प्रकार | दिनांक | नोंदणी क्रमांक | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | खरेदीखत | ०१/०४/१९८१ | -- | दुय्यम निबंधक,अहमदनगर |
| २ | खरेदीखत | २५/०९/१९८७ | ४४१३/१९८७ | दुय्यम निबंधक,अहमदनगर |
| ३ | खरेदीखत | ०१/११/२०१२ | ६१२९/२०१२ | दुय्यम निबंधक क्र.३,अहमदनगर |

वरील कागदपत्रे (मूळ दस्त, मूळ नोंदणी पावती व मूळ सूची क्रमांक २) हरविलेली आहेत. सदर कागदपत्रे कोणास सापडल्यास त्यांनी खालील पत्त्यावर त्वरित कळवावे.
वरील कागदपत्रांच्या आधारे कोणीही कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दि.०७/०३/२०२६

**तेजस करंदीकर**
आशा स्क्वेअर, अहिल्यानगर
मो : ९३७०१४६७५५

# शिवजयंती मिरवणुकीत कर्णकर्कश आवाज; चार डीजे जप्त

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती ६ मार्च रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. शहरात तीन मंडळांनी डीजेच्या दणदणाटात मिरवणूक काढली होती. मिरवणुकीत सर्वच डीजे चालकांनी ध्वनी मर्यादा ओलांडून ११० डेसिबलपर्यंत डिजेचा आवाज वाढवला होता. त्यामुळे कोतवाली पोलिसांनी दोन व तोफखाना पोलिसांनी २ असे एकूण ४ डीजे जप्त केले आहेत.

शहर शिवसेना (शिंदे गट), सागर मुर्तंडकर यांचे वर्चस्व ग्रुप, नगरसेवक सुभाष लोंढे यांचे जय तुळजाभवानी मंडळ अशा तीन मंडळांनी मिरवणूक काढली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून मिरवणुकीस प्रारंभ झाला. भगवे फेटे बांधून महिलांनी दुचाकीवरून रॅली काढली. त्यापाठोपाठ पारंपारिक ढोल–ताशांचे पथक, लेझिम पथक, छत्रपती शिवाजी महाराज आणि मावळ्यांची वेशभूषा केलेले तरूण अशा मोठ्या उत्साही वातावरणात ही मिरवणूक काढण्यात आली. डीजेच्या आणि पारंपारिक वाद्यांच्या तालावर ठेका धरीत माळीवाडा वेस, पंचपीर चावडी, माणिक चौक, भिंगारवाला चौक, कापड बाजार, तेलीखुंट, चितळे रस्ता, चौपाटी कारंजामार्गे दिल्लीगेटपर्यंत ही मिरवणूक आली. मिरवणूक मार्गाला जोडणारे सर्व रस्ते बॅरेकेटींग करुन बंद करण्यात आले होते. शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड वाहतुकीचे नियमन करण्यासाठी तैनात करण्यात आले होते. संपूर्ण मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जात होती. मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता.

मिरवणुकीत पोलिसांकडून डीजेचा आवाज मोजला जात होता. मिरवणुकीत सर्वच डीजे चालकांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी मिरवणुकीत सहभागी झालेले चार डीजे जप्त केले आहेत.



## कुष्ठरुग्णांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती; अल्पोपहाराचे वाटप

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सूर्या फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व शिवसेना सावेडी उपनगर यांच्या वतीने कुष्ठधाम येथे कुष्ठरुग्णांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती करण्यात आली व त्यानंतर अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम ओबीसी सेलचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत (काका) शेळके यांच्या पुढाकाराने सिव्हिल हडको परिसरात आयोजित करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले.

